शनिवार, २४ डिसेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक १५६
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

अलिबागमध्ये अपघातात दोन जणांचा मृत्यू/२

वाशी स्टेशनमधील शौचालयात चक्क पाणीपुरीचे सामान/६

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्ष/७

## मोफत रेशन धान्यवाटपाला वर्षभराची मुदतवाढ



**नवी दिल्ली :** मोदी सरकारने देशातील सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना अर्थात मोफत रेशन वाटपाच्या योजनेला (पीएमजीकेवाय) एक वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी सप्टेंबरमध्ये सरकारने पीएमजीकेवायची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत तीन महिन्यांनी वाढविण्यात आली होती. कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्याच्या उद्देशाने देशव्यापी लॉकडाऊनमुळे गरिबांना मदत म्हणून एप्रिल २०२०मध्ये 'पीएमजीकेवाय' लाँच करण्यात आली. या योजनेंतर्गत ८० कोटी गरीब लोकांना दरमहा पाच किलो गहू आणि तांदूळ मोफत दिले जातात. यासोबत वन रँक वन पेन्शनमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यापूर्वी २०६०० पेन्शनधारकांना लाभ मिळत होता. आता सुधारणा केल्यानंतर २५ लाख पेन्शनधारक झाले आहेत.

# दुबईच्या धर्तीवर पनवेलमधील न्हावेखाडीत 'मिरॅकल'

# चिखलमय ज़मिनीवर भव्यदिव्य अन् सर्वांगसुंदर रामबाग फुलली





(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : हरेश साठे**

दुबईच्या वाळवंटात असलेल्या मिरॅकल गार्डनच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील चिखलमय जमिनीवर भव्यदिव्य आणि सर्वांगसुंदर रामबाग फुलली आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली साकारलेल्या आणि महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवणाऱ्या या उद्यानाचा लोकार्पण सोहळा ते व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नातू अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २२) सायंकाळी करण्यात आले.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जनतेसाठी अनोखी भेट

या सोहळ्यास भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी अर्चना परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, ओबीसी नेते जे. डी. तांडेल, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. गणेश ठाकूर, ज्येष्ठ नेते कान्हाशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, माजी उपमहापौर सीता पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, ज्येष्ठ पत्रकार दा. चां. कडू, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, हरेश केणी, एकनाथ गायकवाड, बबन मुकादम, समीर ठाकूर, भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, कल्पना ठाकूर, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण उपसरपंच विजय घरत, चंद्रकांत घरत, संजय भगत, मयुरेश नेतकर म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, सागर ठाकूर, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, प्रतिक ठाकूर, प्रल्हाद पाटील, ठाकूर कुटुंबीय, कार्यकर्ते आणि हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. (पान २ वर..)

### ग्रामस्थांनी अंतःकरणपूर्वक मानले लोकनेत्याचे आभार

**खाडीकिनारी असलेला न्हावेखाडी परिसर चिखलमय होता. या ठिकाणी असलेल्या म्हसेश्वर मंदिरात जातानाही चिखल तुडवत जावे लागत होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी याकडे अत्यंत जिव्हाळ्याने पाहिले. या मंदिरासह परिसराचा कायापालट एक स्वप्ननगरीत करण्याची खूणगाठ मनाशी बांधली आणि त्यांनी स्वखर्चाने भली मोठी अशी रामबाग साकारली. यानिमित्ताने पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे स्वप्न साकार झाल्याने या ग्रामस्थांनी भव्य पुष्पहाराने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे हृद्य अंतःकरणाने आभार मानत आदर व्यक्त केला.**

# कोरोनासंबंधी दक्षता

## केंद्राकडून राज्यांसाठी मार्गदर्शक तत्वे जारी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जागतिक स्तरावर कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे केंद्र सरकार सतर्क झाले आहे. केंद्राने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविय यांनी शुक्रवारी (दि. २३) सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांसोबत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी कोरोनासंबंधीत ताजी स्थिती काय तसेच राज्यांची त्या संदर्भात तयारी काय आहे याचा आढावा घेतला.

कोरोनाच्या चाचण्या वाढवाव्यात, रुग्णांचा फॉलोअप घ्यावा, त्यांच्यावर योग्य उपचार करावेत आणि लसीकरणावर भर द्यावा, असे निर्देश या वेळी केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी दिले.

दरम्यान, मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यांना कोविड नियमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात आरटी-पीसीआर चाचण्या वाढविण्यास सांगण्यात आले आहे. याशिवाय बूस्टर डोसची व्याप्ती वाढवण्याचेही सूचित करण्यात आले आहे.

## खालापुरात ब्लास्टिंगमध्ये माय-लेकाचा मृत्यू

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

पनवेल-कर्जत रेल्वेच्या दुसऱ्या मार्गाचे काम सुरू असताना ब्लास्टिंगमुळे उडालेले दगड कर्जत-चौक या मुख्य रस्त्यावर येऊन दुचाकीवरून चाललेल्या आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर चार जण जखमी झाले आहेत. ही दुर्घटना शुक्रवारी (दि. २३) सायंकाळी ५.३०च्या सुमारास घडली.

देवकाबाई महादू बडेकर (वय ६०) आणि त्यांचा मुलगा सचिव महादू बडेकर (वय ४५, दोघेही रा. किरवली, ता. कर्जत) अशी मृतांची नावे आहेत. ते दुचाकीवरून घरी येत असताना वडविहीरजवळ त्यांच्या अंगावर ब्लास्टिंगचे दगड पडले. याशिवाय चंद्रकांत मऱ्या मोकल (वय ६५), वंदना चंद्रकांत मोकल (वय ६०, रा. बेणवले, पेण), विकास भारत भोसले (रा. इंदापूर) यांच्यासह अन्य एक जण जखमी झाला आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## आमदार राणा यांना धमकी

**अमरावती : प्रतिनिधी**

बडनेराचे आमदार रवी राणा यांना ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी त्यांचे खासगी सचिव विनोद गुहे यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

गेल्या आठ ते दहा दिवसांपासून आमदार राणा यांच्या मोबाईलवर एका क्रमांकावरून फोन येत आहे. यात अज्ञात आरोपीने उद्धव ठाकरेंबद्दल एकही शब्द उच्चारल्यास पिस्तूल व चाकूने ठार मारण्याची धमकी दिली आहे.

## निवडक

### आमदार मुक्ता टिळक यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे :** येथील कसबा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक यांच्यावर शुक्रवारी (दि. २३) शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी केसरीवाडा येथील निवासस्थानी त्यांच्या पार्थिवाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दरेकर, माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय शिवतारे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ आदींनी अंत्यदर्शन घेतले.

### राज ठाकरेंनी नागपुरात मुख्यमंत्र्यांची घेतली भेट

**नागपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे शुक्रवारी (दि. २३) नागपूर दौऱ्यावर होते. तेथे त्यांनी पक्षाची कार्यकारिणी स्थापन करून पदाधिकाऱ्यांनी नियुक्तीपत्रे दिली. यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.

## सिक्कीममध्ये लष्कराचे वाहन दरीत कोसळून १६ जवानांचा मृत्यू



**गंगटोक : वृत्तसंस्था**

सिक्कीममध्ये शुक्रवारी (दि. २३) लष्कराचे वाहन दरीत कोसळल्याने १६ जवानांचा मृत्यू झाला असून चार जवान जखमी झाले आहे. या दुर्घटनेनंतर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शोक व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार लष्कराच्या तीन गाड्या शुक्रवारी सकाळी जवानांना घेऊन चट्टेनहून थांगूच्या दिशेने निघाले होत्या. हा ताफा उत्तर सिक्कीममधील झेमा येथे वळणाच्या मोठा उतारावर आला असता एका वाहनाच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते दरीत कोसळले. या दुर्घटनेत १६ जवानांचा मृत्यू झाला आहे.

घटना घडल्यानंतर स्थानिक पोलिसांकडून तत्काळ बचावकार्य सुरू करून दरीत कोसळलेल्या चार जखमी जवानांना हेलिकॉप्टरच्या माध्यमातून बाहेर काढण्यात आले. या अपघातात तीन कनिष्ठ अधिकारी आणि १३ जवानांचा मृत्यू झाला आहे, असे भारतीय लष्कराकडून निवेदन जारी करीत सांगण्यात आले आहे.

या दुर्घटनेनंतर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी ट्वीट करीत शोक व्यक्त केला आहे. उत्तर सिक्कीममध्ये झालेल्या रस्ते अपघातात भारतीय लष्कराच्या जवानांच्या बलिदानामुळे दुःख झाले आहे. त्यांच्या सेवेबद्दल आणि वचनबद्धतेबद्दल देश मनापासून कृतज्ञ आहे. शोकग्रस्त कुटुंबीयाप्रती माझ्या संवेदना आहेत. जखमी जवान लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना करतो, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे.

## १०२ दिव्यांगांना मिळाला जयपूर फूटचा आधार

### जनसेवेचा वसा अविरत राहणार : आमदार प्रशांत ठाकूर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**


सामान्य परिवाराला सन्मानाने जीवन जगता आले पाहिजे या भावनेतून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ काम करीत असून जनसेवेचा वसा असाच कायम सुरूच ठेवणार असल्याचे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २३) येथे केले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना जयपूर फूट बसविण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूटसंदर्भात ऑक्टोबर महिन्यात शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून मापे घेण्यात आली होती. त्यानुसार पुढील प्रक्रिया होऊन कृत्रिम अवयव तयार झाले. हे कृत्रिम अवयव शुक्रवारी १०२ व्यक्तींना बसविण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिव्यांग व्यक्तींची आवर्जून चौकशी करून त्यांच्याशी संवाद साधला.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या उपक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, डॉ. संतोष आगलावे, डॉ. सचिन जाधव, साधू वासवानी मिशनचे मार्केटिंग हेड डॉ. मिलिंद जाधव, डॉ. सलील जैन, डॉ. सुशील ढगे, चिंध्रण ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ पाटील, शिवाजी दुर्गे, संजय जाधव, ज्ञानेश्वर पाटील, मंडळाचे कार्यालयीन व्यवस्थापक अनिल कोळी आदी उपस्थित होते.

## आयपीएल लिलावात कोटीच्या कोटी उड्डाणे!

### सॅम करन ठरला सर्वांत महागडा खेळाडू



सॅम करन
१८.५० कोटी

कॅमरॉन ग्रीन
१७.५० कोटी

बेन स्टोक्स
१६.२५ कोटी

**कोची : वृत्तसंस्था**

जगातील सर्वांत मोठी लीग अर्थात इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या आगामी हंगामासाठी शुक्रवारी (दि. २३) कोची येथील लिलावात जबरदस्त बोली लागल्याचे दिसून आले. इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करन याला तब्बल १८.५० कोटींना पंजाब किंग्सने विकत घेत नवा विक्रम केला.

याआधी आयपीएलच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज अष्टपैलू ख्रिस मॉरिस सर्वांत महागडा खेळाडू ठरला आहे. राजस्थान रॉयल्सने त्याला २०२१मध्ये १६.२५ कोटींना खरेदी केले होते. यंदा त्याचा विक्रम मोडीत निघाला आहे. सॅमने आयपीएलमध्ये आतापर्यंत ३२ सामन्यांतील २३ डावांत ३३७ धावा केल्या आहेत. ५५ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे, तर गोलंदाजीत ३२ विकेट घेतल्या असून ११ धावा ४ विकेट ही त्याची सर्वोच्च कामगिरी आहे.

याशिवाय कॅमरॉन ग्रीन (ऑस्ट्रेलिया) आणि बेन स्टोक्स (इंग्लंड) यांनाही तगडी किंमत मिळाली. ग्रीनला १७.५० कोटींना मुंबई इंडियन्सने, तर बेन स्टोक्सला १६.२५ कोटींना चेन्नई सुपर किंग्जने विकत घेतले आहे. निकोलस पूरनलाही (वेस्ट इंडिज) १६ कोटींना लखनौ सुपरजायंट्सने विकत घेतले.

यंदाचा टी-२० विश्वचषक इंग्लंडने जिंकला. त्यामुळे इंग्लंडच्या खेळाडूंना चांगली बोली लागली. सॅम, स्टोक्स यांना मिळालेल्या रेकॉर्डब्रेक किमतीसह युवा खेळाडू हॅरी ब्रुकलाही तब्बल १३.२५ कोटींना सनरायझर्स हैदराबादने विकत घेतले. भारतीय खेळाडूंमध्ये मयंक अग्रवालला सर्वाधिक ८.२५ कोटी रुपये मोजून हैदराबादने आपल्या ताफ्यात घेतले आहे.

## महाराष्ट्र भाजयुमोतर्फे २५ डिसेंबर ते १२ जानेवारीपर्यंत अटल युवा पर्व



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने २५ डिसेंबर ते १२ जानेवारीपर्यंत भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती दिनापासून ते राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती अर्थात राष्ट्रीय युवा दिनापर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील तरुणांना वेगवेगळ्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा मानस भाजप युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी दिली.

अटल युवा पर्वमध्ये २५ डिसेंबर रोजी अटल डिबेटिंग क्लब अंतर्गत अटल वक्तृत्व स्पर्धेचे दोन स्तरावर आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २५ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा राज्यातील संघटनात्मक जिल्ह्यांत होणार असून प्रत्येक जिल्ह्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन विजेते राज्यस्तरावर पाठविण्यात येणार आहेत, तर ५ जानेवारीपूर्वी राज्यस्तरीय स्पर्धा होईल.

वक्तृत्व स्पर्धेसाठी 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा डिजिटल इंडिया सुशासनावर भर', 'भारताची पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल', 'फुकटखोरी राजकारणातून विकासाच्या राजकारणाकडे जाणे काळाची गरज', 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचे युवकांच्या सक्षमीकरणावर लक्ष' आणि 'अमृतकाल येणारा भारत व युवकांचे योगदान' असे पाच विषय आहेत. (पान २ वर..)

## ग्रामपंचायतींमधील विजयी शिलेदारांचा आज सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती व सुशासन दिनानिमित्त उत्तर रायगड भाजपच्या वतीने ग्रामपंचायतींचे नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार सोहळा पनवेलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

पनवेल, उरण, कर्जत व खालापूर तालुक्यांतील विविध ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत विजयी झालेल्या भाजपच्या शिलेदारांचा रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सन्मान करण्यात येणार आहे.

## आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट व्हायला हवी

### सुशांतच्या वडिलांची मागणी



**पाटना : वृत्तसंस्था**

दिशा सालियान मृत्यू प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव येत आहे. एसआयटीच्या चौकशीतूनच सत्य समोर येईल. यासाठी आदित्य ठाकरेंची नार्को टेस्ट व्हायला हवी, अशी मागणी दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याचे वडील के. के. सिंह यांनी केली आहे.

दिवंगत अभिनेता सुशांत सिंहची मॅनेजर दिशा सालियान मृत्यू प्रकरणाची विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्याचे आदेश शिंदे-फडणवीस सरकारने दिले आहेत. या प्रकरणात के. के. सिंह यांनीही उडी घेतली आहे. ते म्हणाले, जसे मी बातम्यांमध्ये पाहिले की दिशा सालियान प्रकरणात आदित्य ठाकरेंचे नाव येत आहे. त्यांची नार्को टेस्ट व्हायला हवी.

दिवंगत अभिनेता सुशांतचे वडील के. के. सिंह यांनी मागच्या महाविकास आघाडी सरकारवरही गंभीर आरोप केला आहे. हे यापूर्वीच व्हायला हवे होते, मात्र त्या वेळी सरकार दुसरे होते. त्यामुळे हे होऊ शकले नाही. आताच्या सरकारने घेतलेला निर्णय योग्य आहे. गेल्या सरकारमध्ये चौकशी योग्य प्रकारे यामुळे झाली नाही, कारण या प्रकरणात तेच लोक यामध्ये सामिल होते, असे त्यांनी म्हटले आहे.

# भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांवर चर्चा

## नागपुरात पहिले अधिवेशन उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती




**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र भटक्या विमुक्त आघाडीचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन गुरुवारी (दि. २२) नागपूर येथे उत्साहात झाले. अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय इदाते आयोगाचे माजी अध्यक्ष भिकुजी (दादा) इदाते, आघाडीचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार व प्रदेश प्रभारी संजय केनेकर यांच्या हस्ते झाले.

अधिवेशनाचा समारोप भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. या वेळी ते म्हणाले की, भटके विमुक्तांनी आता काळजी करण्याची गरज नाही. शिंदे-फडणवीस सरकार हे भटक्या-विमुक्तांचे प्रश्न सोडवण्याचे काम करीत आहे. अधिवेशनात ठरावाच्या स्वरूपात ज्या मागण्या केल्या आहेत त्याबाबत लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत एक बैठक घेण्यात येईल. या सर्व मागण्या पूर्ण करण्याची जबाबदारी पालक म्हणून आपण घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

भटक्या समाजातील सर्व घटकांना पक्ष स्तरावर व निवडणुकीमध्ये न्याय देण्याचे काम भाजप करेल. कोणावरही अन्याय होणार नाही. या वेळी त्यांनी भटके विमुक्त आघाडीने भव्य असे पहिले राज्यव्यापी अधिवेशन भरवून ते यशस्वी केल्याने आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले तसेच शासकीय समित्यांवर जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी देण्याचे आश्वासनही त्यांनी यानिमित्ताने दिले.

अधिवेशनासाठी माजी खासदार विकास महात्मे, आमदार गोपीचंद पडळकर, विश्वास पाठक, भटके मुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस अशोक चोरमले, प्रवक्ते गणेश हाके, विनोद वाघ, माजी आमदार विजयराज शिंदे, भटके विमुक्त आघाडीचे माजी प्रदेश अध्यक्ष योगेश बनसह आघाडीचे सर्व प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश अध्यक्ष नरेंद्र पवार यांनी भटके विमुक्तांचे पारंपरिक उद्योग-व्यवसाय, पारंपरिक लोककलेला वाव देण्यासाठी ही आघाडी प्रयत्नशील असल्याचे सांगितले तसेच त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी सरकार दरबारी पक्षाच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे म्हटले.

काँग्रेस-राष्ट्रवादीमुळे भटके विमुक्त समाज मागे राहिला आहे. आता भटके विमुक्तांचे सरकार आहे. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. हिंदुत्वाच्या पोशाख घालून काही राजकीय मंडळी भटके विमुक्तांना विचलित करू पाहत आहेत, असे प्रदेश महामंत्री संजय केनेकर यांनी सांगितले.

दादा विधाते, विकास महात्मे, गणेश हाके आदींचीही भाषणे झाले. भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस अशोक चोरमले यांनी विविध मागण्यांचे प्रस्ताव सदर केले.

अधिवेशनास प्रदेश सरचिटणीस गोविंदा गुंजाळकर, संतोष आव्हाड, राजू साळुंखे, शिवाजी आव्हाड, देविदास राठोड, धरमसिंग राठोड, महिला प्रदेश अध्यक्ष डॉ. उज्ज्वला हाके, सरचिटणीस सुहासिनी केकाणे, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख प्रमोद परदेशी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, उपाध्यक्ष तुकाराम आखाडे, रामा शेडगे, प्रभारी चंद्रकांत मंजुळे, पनवेल महिला अध्यक्ष मीनाक्षी गिते, युवक अध्यक्ष अमोल गायकवाड, युवती अध्यक्ष भाग्यश्री ढाकणे व सर्व विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सिडको महागृहनिर्माण योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस मुदतवाढ




**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना दिवाळी २०२२ या गृहनिर्माण योजनेस मिळत असलेल्या नागरिकांच्या उदंड प्रतिसादामुळे आणि नागरिकांना केलेल्या मागणीमुळे सदर योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास ६ जानेवारी २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे.

या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास २२ डिसेंबर २०२२ ही अंतिम तारीख होती. या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या उलवे नोडमध्ये ७,८४९ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे महागृहनिर्माण योजना दिवाळी-२०२२ करीता ऑनलाइन अर्ज नोंदणी ६ जानेवारी २०२३ पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ७ जानेवारी २०२३ पर्यंत सादर करता येणार आहेत. ऑनलाइन शुल्क भरण्याची अंतिम तारीख ९ जानेवारी २०२३ आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १२ जानेवारी २०२३ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १६ जानेवारी २०२३ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार योजनेची संगणकीय सोडत ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी असल्याचे नमूद करण्यात आले होते, त्या ऐवजी १९ जानेवारी २०२३ रोजी पार पडणार आहे, असे वाचण्यात यावे.

## प्रामाणिकपणा, सभ्यपणा, स्वाभिमान कधीही सोडू नका : दिलीप भोसले



**सातारा : प्रतिनिधी**

शॉर्टकट हा एक सापळा असतो. तुम्ही तुमच्या क्षमता वापरल्या नाहीत तर तुम्ही नाहीसे होत जाता. म्हणून स्वतःचा आत्मविश्वास कमी करू नका. कोणतेही काम करायला नाही म्हणू नका. प्रामाणिकपणा, सभ्यपणा व स्वाभिमान कधीही सोडू नका, असे विचार सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेने इस्माईलसाहेब मुल्ला यांच्या ४९व्या पुण्यतिथीनिमित्त भोसले यांना इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला. त्या वेळी यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील होते. व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, ॲड. दिलावर मुल्ला, इस्माईल साहेबमुल्ला यांचे कुटुंबीय, नातेवाईक, प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य आर. के.शिंदे, डॉ. मोहन पाटील, प्राचार्य डॉ. अशोक भोईटे आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले की, कर्मवीर अण्णा आणि इस्माईलसाहेब यांचा ऋणानुबंध होता. संस्थेच्या बोर्डिंगचे ते पहिले विद्यार्थी होते. अण्णांनी त्यांना वकिलीचे शिक्षण घेण्यास पाठवले. वकील झाल्यानंतर त्यांनी रयत शिक्षण संस्थेची पहिली केस जिंकली. रयत शिक्षण संस्थेचे ते मानद सचिव होते. संस्थेचा साधा चहा कधी त्यांनी घेतला नाही. दिलावरवर जेवढे प्रेम केले नाही तेवढे आमच्यावर केले.रयत शिक्षण संस्थेत सचिव असताना त्यांनी स्वतःच्या मुलीसाठी ऑर्डर काढली नाही. त्यांचा त्याग मोठा होता.

प्रारंभी रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते दिलीप भोसले यांना सन्मानचिन्ह, मानपत्र व २५ हजार रुपये देऊन जीवन गौरव पुरस्कार देण्यात आला. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव,प्राचार्य डॉ. बाळ कांबळे,प्राचार्य डॉ. आतार, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव राजेंद्र साळुंखे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी केले. आभार प्रभारी प्राचार्य डॉ. दीपा पाटील यांनी मानले.

## मिशन वात्सल्य योजनेंतर्गत बालसंगोपन अनुदानात वाढ करणार

### मंत्री मंगल प्रभात लोढा यांची विधानसभेत घोषणा



**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात कोरोना कालावधित विधवा झालेल्या महिलांची उपजीविका आणि अनाथ बालकांसाठीच्या बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये २ हजार ५०० रुपयांपर्यंत वाढ करण्याबाबत शासन सकारात्मक असून येत्या तीन महिन्यांत सदरहू रक्कम वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी विधानसभेत दिली.

राज्यात मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत अनुदानात वाढ तसेच पंडिता रमाबाई व्याजमाफी योजना अंमलात आणण्याबाबत सदस्य ड.आशिष शेलार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री श्री. लोढा बोलत होते.

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, कोरोना संसर्गाने कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्याने विधवा महिलांची उपजीविका आणि अनाथ बालकांच्या संगोपनासाठी मिशन वात्सल्य योजना सुरु करण्यात येणार आहे. बालसंगोपन आणि महिलांच्या रोजगारासाठी पंडिता रमाबाई व्याजमाफी योजना अंमलात आणून या योजनेअंतर्गत मिळणारे सहायक अनुदान १ हजार १०० रुपयांवरून २ हजार ५०० करण्याची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे. त्यानुसार ही योजना अंमलात आणण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बालसंगोपन योजनेंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाबाबत वाढ करण्याच्या अनुषंगाने सर्व विभागांची सहमती मिळाली आहे. या योजनेचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी विभागाच्यावतीने राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनेबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विधवा महिलांचे बचत गट बनवून या गटांना १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्यात येणार असून त्याचे व्याज शासनाच्या माध्यमातून अदा करण्यात येईल, असेही मंत्री श्री. लोढा यांनी सांगितले.

या चर्चेत सदस्य सर्वश्री राम कदम, संजय गायकवाड, मोहन मते, राम सातपुते यांनी सहभाग घेतला.

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर अपघात रोखण्यासाठी उपाययोजनांचे पालन करा : शंभूराज देसाई

**नागपूर : प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्यासंदर्भात संबंधित यंत्रणेला सूचना देण्यात आल्या आहेत. वेगावर नियंत्रण, लेन कटिंग टाळणे, अवजड वाहनांनी नियम पाळणे या बाबींकडे लक्ष देण्यात येईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

विधानसभा सदस्य भीमराव तापकीर यांनी नियम ९४ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना मंत्री देसाई बोलत होते.

ते म्हणाले, रस्ते सुरक्षेसंदर्भात सुधारित धोरण यापूर्वीच तयार करण्यात आले आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभाग, पोलिस, महामार्ग पोलिस, राष्ट्रीय रस्ते विकास यंत्रणा यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी बैठक घेऊन यंत्रणेला यासंदर्भात निर्देश दिले असल्याची माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

या महामार्गावर अपघात टाळण्यासाठी जे प्रयत्न करण्यात येत आहेत त्यामुळे सन २०१६पासून अपघात संख्या आणि अपघातामुळे होणारे मृत्यू यात घट होत असल्याचे दिसून येत आहे.

स्पीड गनची संख्या वाढवणे, अवजड वाहने डाव्या मार्गिके मधूनच जातील याकडे लक्ष देणे याबाबत परिवहन विभाग आणि महामार्ग पोलिसांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, अधिक सुरक्षित प्रवासासाठी ज्या उपाययोजना आवश्यक आहेत त्या केल्या जातील, असेही मंत्री देसाई यांनी या वेळी सांगितले.

## वीज कंत्राटी कामगारांना भरतीमध्ये प्राधान्य देणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती



**नागपूर : प्रतिनिधी**

महावितरण कंपनीमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक कामगारांची जवळपास २६,६४८ पदे रिक्त आहेत. कंत्राटी कामगारांना सेवेत थेट घेता येत नसल्याने भरती प्रक्रियेत कंत्राटी कामगारांना प्रत्येक वर्षी अधिकचे गुण देऊन प्राधान्य देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

वीज वितरण कंपनीच्या कंत्राटी कामगारांना सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रश्न सदस्य प्रवीण दटके यांनी उपस्थित केला होता, प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते.

श्री. फडणवीस यांनी सांगितले की, महानिर्मिती व महापारेषण कंपनीमध्ये लाईटमन तथा तत्सम कामगारांची पदे नाहीत. मात्र राज्य शासन लवकरच महावितरणमध्ये मोठ्या प्रमाणात पदभरती करणार आहे. यामध्ये कंत्राटी कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा महामंडळाच्या पद्धतीने विमा संरक्षण देण्यात येईल. प्रत्येक वर्षी पाच गुण द ` ऊ न ग ु ण व त्त ा ा यादीवरयेण्यासाठी प्रयत्न केले जातील. महानिर्मिती कंपनीमध्ये कंत्राटदाराच्या अधिनस्त अंदाजे १७,४४३ कंत्राटी कामगार कार्यरत असून महापारेषण व महावितरणमध्ये सर्वसाधारणपणे अनुक्रमे ३,९४० व २१,५५१ कंत्राटी कामगार बाह्यस्त्रोताच्या माध्यमातून काम करतात.

महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीमध्ये कामाच्या स्वरूपानुसार प्रासंगिक तसेच तात्पुरती कामे कंत्राटदाराकडून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून करून घेतली जातात.

प्रत्येक वेळेस कंत्राटदार नेमताना बाह्यस्त्रोत कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा केले जाण्याची अट निविदा तसेच संबंधित कंत्राटदाराच्या कार्यादेशामध्ये अंतर्भूत केली जाते. मात्र कंत्राटदार कमी वेतन देतात, याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याने कंत्राटी कामगारांना त्यांच्या बँक खात्यात थेट वेतन दिले जाईल.

कंपनी अधिनियमानुसार किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यासाठी वेतन समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल. शिवाय वीज मंडळाचे कोणत्याही स्थितीत खाजगीकरण करण्याचा शासनाचा विचार नाही, असेही एका उपप्रश्नाला उत्तर देताना श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी झालेल्या चर्चेत सर्वश्री सदस्य चंद्रशेखर बावनकुळे, महादेव जानकर, अनिकेत तटकरे, सचिन आहेर आणि अनिल परब यांनी सहभाग घेतला.

पान १ वरून

## चिखलमय जमिनीवर भव्यदिव्य अन् सर्वांगसुंदर रामबाग फुलली

श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात १४ एकर जागेतील रामबाग उद्यानात प्रथम भव्य आणि सुरेख प्रवेशद्वाराने होणारे स्वागत मन अत्यंत प्रफुल्लित करते. निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या रचना येथे पहायला मिळतात. तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, पाळणे, डबल हर्ट व स्टोन असे दोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी मन मोहून टाकतात. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते. त्या वेळी विद्युत रोषणाई डोळ्यांचे पारणे फेडते. या सोबतीनेच वाहनांसाठी सुसज्ज पार्किंग, सुरक्षा, प्रसाधनगृह अशा दर्जेदार सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या उद्यानातून बाहेर पडताना रामबागला दिलेल्या भेटीबद्दल आभार मानणारे शब्ददेखील आनंद देणारे आणि पुन्हा येथे येण्याची ओढ लावून जातात. विशेषतः या ठिकाणी लहानग्यांपासून वृद्धांचा विचार आवर्जून करण्यात आला आहे.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, मी लहान असताना येथील खाडीचा बंधारा फुटला होता. त्यामुळे न्हावाखाडी, गव्हाण, कोपर येथील १२०० एकर पूर्ण जमीन समुद्राच्या पाण्याखाली गेली. तेव्हा सरकारचे खारलँड नावाचे बोर्ड होते. या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे काम झाले, पण तत्कालीन सरकारने त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्यामुळे ही सर्व जमीन चिखलाची झाली.

या ठिकाणी असलेल्या म्हसेश्वर मंदिरात जातानाही चिखलातून वाट काढावी लागत होती आणि त्याबद्दल मनाला खंत असायची. आपण या ठिकाणी जन्मलो, वाढलो, प्राथमिक शिक्षण घेतले, खासदार झालो त्या गावाच्या लौकिकासाठी काही तरी वेगळे केले पाहिजे हा चंग मी मनाशी बांधला. देवळात जाताना चिखलातून जावे लागत होते आणि आताची लहान मुलांची जी पिढी आहे त्यांना खेळायला, फिरायला जागा नाही. २०० मीटरच्या पुढे फिरता येत नाही. त्यामुळे आयुष्यात काही तरी केले पाहिजे की ज्यातून गावाला अधिक नावलौकिक मिळेल असे मनोमन वाटत होते. म्हणूनच गेल्या पाच-सहा वर्षांपासून रामबागचे स्वप्न डोक्यात होते. माझ्या गावाकरिता मी काही करू शकलो तर माझ्या जीवनाचे सार्थक होईल अशी भावना होती आणि तो उद्देश सफल झाला आहे.

म्हसेश्वर मंदिर आणि रामबाग तयार झाली याचा मला अत्यंत आनंद आहे. पनवेल, उरणच नव्हे; तर नवी मुंबईतील लोकं या ठिकाणी भेट देत आहेत. न्हावा-शिवडी सी लिंक पूर्ण झाल्यावर मुंबई आणि राज्यातील लोकंदेखील हे उद्यान पहायला येतील याची मला खात्री आहे. दुबई, कॅनडा अशा अनेक देशांतील उद्याने आम्ही पाहिली. दुबईतील मिरॅकल गार्डन पाहिले आणि असेच मिरॅकल घडविणारे उद्यान उभारण्याचा संकल्प केला होता. दुबईतील गार्डन वाळवंटात उभारले गेले आहे आणि न्हावेखाडी पट्टा चिखल व पाण्याखाली आहे. त्यामुळे जसे दुबईत मिरॅकल घडले त्याच पद्धतीने आपल्या या ठिकाणीही चिखल व पाण्याखाली गेलेल्या पडीक जागेत मिरॅकल घडले पाहिजे या उद्देशाने त्या धर्तीवर रामबाग उभारली आहे, असे सांगतानाच सर्वांचे आभार मानून आपल्या विभागाकरिता हे उद्यान उल्लेखनीय होईल आणि या उद्यानाचा उपयोग लोकांना होईल याचे मला समाधान आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले.

दरम्यान, या सोहळ्यास उद्योजक जे. एम. म्हात्रे, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील यांनीही सदिच्छा भेट देऊन या समाजोपयोगी व उल्लेखनीय कार्याला शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र भाजयुमोतर्फे २५ डिसेंबर ते १२ जानेवारीपर्यंत अटल युवा पर्व

३ जानेवारी रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात येणार असून १ ते ५ जानेवारीदरम्यान नागपूर, अमरावती, नाशिक, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड, पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर व ठाणे या प्रमुख शहरांसह ज्या ठिकाणी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी उपलब्ध होतील अशा व अन्य शहरांमध्येदेखील आयएएस किंवा आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

७ ते ११ जानेवारी या कालावधीदरम्यान जिल्हानिहाय युवा वॉरियर शाखेचे उद्घाटन करण्यात येणार असून त्यामध्ये राज्याचे मंत्री, खासदार, आमदार, भाजप व युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, भाजप व युवा मोर्चा प्रदेश पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, मंडल अध्यक्ष, प्रभारी यांच्यासह अनेकांच्या माध्यमातून १८ ते २४ वयोगटातील तरुणांना या शाखेच्या माध्यमातून भाजपशी जोडण्याचा प्रयत्न युवा मोर्चा करणार आहे.

१२ जानेवारी रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती अर्थात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पाच किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेला यंग इंडिया रन मॅरेथॉन स्पर्धा असे नाव देण्यात आले आहे.

## अलिबागमध्ये अपघात; दोन जणांचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

रेवस-अलिबाग रस्त्यावर झिराड नांदाईपाडा येथे झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

भरधाव कार मांडवा येथून अलिबागच्या दिशेला जात असताना झिराड नांदाईपाडा येथे आली असता चालक निलेश घरत यांचे नियंत्रण सुटल्याने समोरील सायकलस्वाराला उडवले. त्यानंतर वडाच्या झाडाला ठोकर दिली. त्यात सायकलस्वार आणि कारचालक निलेश घरत हे गंभीर जखमी झाले. त्यांना ग्रामस्थ आणि मांडवा पोलिसांनी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले. घरत हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष होते.

## निवडक

### अवैध खाद्यपदार्थ विक्रीवर कारवाई

**पनवेल :** उघड्यावर इडली मेंदू वडा हे खाद्यपदार्थ विक्री करण्यासाठी सिलेंडरचा वापर केल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळोजा फेस-१ शंकर मंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावर इसक्की यादव हा बेकायदेशीर रित्या सिलेंडरचा वापर करून इडली व मेंदू वडा विक्री करत असल्याचे दिसून आले. त्यामुळे गॅस सिलेंडरचा वापर करून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### खारघरमध्ये घरफोडी

**पनवेल :** एका बंद घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. खारघर सेक्टर ३ येथे राहणाऱ्या जयश्री धराडे यांच्या बंद घरात अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाज्याचा काडी कोयंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला. त्याने जवळपास एक लाख ७० हजार रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने चोरी केले व तो पसार झाला. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# गव्हाण हद्दीतील गावांमध्ये सोयीसुविधा द्या

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सिडको प्रशासनाला सूचना ■ बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील गावांमध्ये पायाभूत सुविधा मिळण्यासंदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २३) सिडको प्रशासनासोबत चर्चा केली. उलवे नोड रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या बैठकीमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गावांमधील प्रलंबित कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासंदर्भात सिडको अभियंत्यांना सुचनावजा मागणी केली.

गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा या गावांना सिडकोकडून पायाभूत सुविधा मिळाव्यात आणि विकासकामे मार्गी लावावीत या संदर्भात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडको प्रशासनासोबत बैठक घेतली. गावांमध्ये शाळा, पाण्याची टाकी, अंतर्गत गटारे, रस्ते कॉँक्रिटीकरण करणे, विद्युत लाईन, स्मशानभूमी, तलावांवर ज्येष्ठ नागरिक कट्टा तसेच पत्रा शेड व ओपन जीम इत्यादी सुविधा करण्यात याव्यात या मागणीसाठी बैठक घेण्यात आली. गावांतील सोयीसुविधांवर सविस्तर चर्चा करून विकासकामे लवकर मार्गी लावावीत, अशा सूचनावजा मागणी सिडको प्रशासनाकडे करण्यात आली.

या बैठकीला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह सिडकोचे सीई गोसावी, एक्झिकेटिव्ह इंजिनिअर पितळे, असिस्टंट इंजिनिअर भावे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, सुनिता घरत, उषा देशमुख, कामिनी कोळी, जयवंत देशमुख तसेच सुहास भगत आदी उपस्थित होते.

## करंजा बंदर नव्या वर्षात होणार कार्यान्वित

**उरण : रामप्रहर वृत्त**

करंजा बंदराचे काम धीम्या गतीने रखडत-रखडत सुरू आहे. मुंबईतील ससूनला पर्याय म्हणून एक हजार मच्छीमार बोटींच्या क्षमतेचे करंजा मच्छीमार बंदर उभारले जात आहे. या बंदराचे काम येत्या दोन महिन्यांत म्हणजे नव्या वर्षात २०२३ मध्ये पूर्ण करून बंदर कार्यान्वित केले जाईल, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून देण्यात आली आहे. नवीन सरकारच्या जलद गतीने काम करण्याच्या पद्धतीमुळे लवकरच पूर्ण होणार आहे.

बंदराचे काम अपुऱ्या निधीअभावी अपूर्ण राहिले होते. बंदर पूर्णत्वासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडून आता फेब्रुवारी २०२३चा नवा मुहूर्त ठरविण्यात आली आहे. २०१२मध्ये करंजा बंदराचे काम सुरू करण्यात आले आहे. हे काम ६४ कोटींवरून १५० कोटींपर्यंत पोहचले आहे. वाढलेल्या अतिरिक्त खर्चाचा निधी शासनाकडून वेळेत उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे निधीअभावी अद्ययावत करंजा बंदराचे काम सध्या अत्यंत धीम्या गतीने सुरू आहेत. बंदरात साचलेला गाळ काढणे, स्वच्छतागृह उभारणे, बंदराची जोडणाऱ्या रस्त्यांचे कामे अद्यापही झालेली नाहीत. वाढलेला निधी दोन्ही सरकारकडून मिळवून घेण्यासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांनी प्रयत्न सुरू आहेत.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारावर उभारण्यात येणाऱ्या एक हजार मच्छीमार बोटी लॅण्ड होण्याच्या क्षमता असलेले बंदर राज्यातील मच्छीमारांसाठी वरदान ठरणार आहेच. या मासेमारी बंदरामुळे परिसरातील २५ हजार नागरिक, व्यावसायिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मच्छीमारांचेही भाग्य उजळणार आहे. हे बंदर ६०० मीटर लांबीचे इंग्रजी 'ई' आकाराचे बंदर, आधुनिक फिश लॅडिंग जेट्टी, वेस्टवॉटर ट्रिटमेंट प्लाण्ट, रेडिओ अॅण्ड कम्युनिकेशन सेंटर, फिश प्रोसेसर, शीतगृह, मासळी लिलाव आणि विक्री केंद्र, डिझेल पंप, इत्यादी अत्याधुनिक सोयी-सुविधा मच्छीमारांसाठी उपलब्ध होणार आहेत.

## नांदगाव-भिंगारी रस्त्याचे रुंदीकरण

### भाजपचे अजय बहिरा यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्या पाठपुराव्यामुळे नांदगाव-भिंगारी गावातील गणपती विसर्जन घाटापर्यंत असलेल्या रस्ता रुंदीकरणाचे काम महापालिकेमार्फत सुरू झाले आहे.



(छाया : पंकज डावलेकर)

नांदगाव-भिंगारी रस्ता हा अरुंद असल्याने नागरिकांना तेथुन दुचाकी व चारचाकी वाहनांना तेथून ये-जा करण्यास समस्या उद्भवत होत्या. तसेच या रस्त्यावर अनेक ठिकाणांवर खड्डे पडून रस्त्यांचे विद्रुपिकरण झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. या रस्त्याचे पनवेल महापालिकेमार्फत रुंदीकरण केल्यास तेथुन प्रभागातील तसेच नांदगाव व भिंगारी गावातील नागरीकांना ये-जा करणे सोयीचे होईल. या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग २० मधील नांदगाव-भिंगारी गावातील गणपती विसर्जन घाटापर्यंत असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत पनवेल महापालिका प्रशासनाकडून योग्यती उपाययोजना करण्याकरीता आपल्या पनवेल महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकारी वर्गाला आदेशित करावे.

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग १ मधील सर्व अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय स्वरुपाची झाली असुन, या रस्त्यावर छोटे मोठे खड्डे पडल्याने रस्त्यावरून नागरिकांना ये-जा करताना मोठ्या प्रमाणात नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे प्रभागातील नागरिकांना प्रवास करण्यास अडथळा निर्माण होत आहे. विषयाचे गांभिर्य लक्षात घेता पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग १ मधील सर्व अंतर्गत रस्त्यांची मान्सूननंतर तत्काळ दुरुस्ती (डागडूजी) करण्याकरीता आपल्या संबंधित विभागाच्या अधिकारी वर्गाला आदेशित करावे, असे बहिरा यांनी संबंधित प्रशासनाला दिलेल्या निवेदनामध्ये नमूद केले होते.



**पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या निधीतून भोकरपाडा गावात अंगणवाडीचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी देविदास पाटील, गणेश आगिवले, महेंद्र पाटील, सचिन पाटील, भाजप नेते दीपक पाटील, निलेश पाटील, दत्तात्रय पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : शिवकर ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच आनंद ढवळे यांना माजी जि. प. सदस्य अमित जाधव, ज्ञानेश्वर पाटील, उदय म्हस्कर, महेश केणी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## पळस्पे येथे वाहतूक पोलिसांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

लोकांसाठी दिवसरात्र अखंड सेवा देणाऱ्या पोलीस बांधवाकडे बऱ्याचदा दुर्लक्ष होत असते. म्हणून अश्यावेळी एक बांधिलकी जपत पनवेलमधील वर्चस्व युवा फाउंडेशनच्या कोकण विभाग महिला अध्यक्ष तथा माजी नगरसेविका नीता माळी व भाजप सोशल मिडीया सेलच्यइज्ञाशहर संयोजक प्रसाद हनुमंते यांच्यातर्फे महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पे येथे वाहतूक पोलीसासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.



अप्पर पोलीस महासंचालक कुलावंत सारंगल, पोलीस अधीक्षक मुख्यालय अरविंद साळवे, पोलीस अधीक्षक, रायगड परिक्षेत्र, पोलीस उप अधीक्षक संदीप भागडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गौरी मोरे, प्रभारी पोलीस उप निरीक्षक श्री गणेश बुरकुल, वाहतूक शाखा, पळस्पे केंद्र याच्या कार्यालयात फाउंडेशन तर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी सुश्रुशा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलतर्फे जनसंपर्क अधिकारी कुमार लोंढे, डॉ. राजेंद्र क्षीरसागर, डॉ. आयुशा खान, स्टाफ रमेश कदम यांनी पोलीस बंधावांच्या आरोग्य तपास कामी विशेष सहकार्य केले. या वेळी वर्चस्व फाउंडेशनच्या कोकण विभाग महिला अध्यक्ष नीता माळी, महाराष्ट्र पोलीस मित्र व नागरिक समन्वय समिती चे कोकण विभाग अध्यक्ष, प्रसाद हनुमंते, रायगड जिल्हा अध्यक्ष मंगेश चंदने, सामाजिक कार्यकर्त्या स्नेहल खरे, ज्योना माळी, अमित माळी आदी उपस्थित होते.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात चर्चासत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २३) वैमानिकी प्रशिक्षणावरती चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण चर्चा सत्रासाठी स्कायबोर्न विमान प्रशिक्षण संस्थेचे प्रशांत खेडेकर व इराम शेख हे उपस्थित होते.



प्रमुख वक्त्यांनी या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना रायगड व नवी मुंबईमधील विमान कंपनीमध्ये वेगवेगळ्या असणाऱ्या संधी तसेच स्व. दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये वैमानिक बनण्याच्या वेगवेगळ्या संधी व मुलींसाठी एअर होस्टेज बनण्याच्या संधी याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना विमान कंपनीमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या संधी व त्या संधीच सोनं कशाप्रकारे करायचं याविषयी मार्गदर्शन केले व पुढील करिअरसाठी त्यांना खुप शुभेच्छा दिल्या.

या चर्चासत्राचे आयोजन प्रा. रेवन शिंदे (समन्वयक करिअर गायडन्स अॅण्ड प्लेसमेंट सेल) तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. डॉ. दीपिका हसीजा प्रा. डॉ. अविनाश जुमारे, प्रा. राहुल कांबळे यांनी सहकार्य केले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## रेल्वे प्रवाशांच्या सेवेत येणार उद्वाहन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानकातील प्रवाशांच्या सेवेत उद्वाहन बसवण्याचे काम प्रगतिपथावर आहे. साधारण २० प्रवाशांची क्षमता या उद्वाहनाची आहे. स्थानकात अनेक महिने रखडलेले स्थानिक प्रवासी उद्वाहनाबद्दल स्थानिक प्रवासी संघटना पाठपुरावा करत होती. अखेर त्याला यश मिळाल्याने नववर्षात ते प्रवाशांच्या सेवेत येणार आहे.

पनवेल रेल्वेस्थानकात मुंबई दिशेकडे पादचारी पुलाला उद्वाहन बसवले आहे, मात्र स्टक्चर तयार होऊन अनेक महिने लोटले, तरी पादचारी पुलाला लागून बांधलेले उद्वाहन प्रवाशांच्या सेवेत येत नव्हते. त्यामुळे प्रवाशांनी स्थानिक रेल्वे प्रशासनाला उद्वाहन तत्काळ सुरू करण्याची विनंती केली होती, परंतु पूर्वीच्या ठेकेदाराने अर्धवट काम सोडून गेल्याने उद्वाहन बसवण्यास विलंब लागला होता, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. सद्यस्थितीत उद्वाहनाचे काम पूर्णत्वास आले आहे. व नववर्षाला उद्वाहन सुरू होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## सीकेटी जुनिअर कॉलेजमध्ये बीएलएस प्रशिक्षणाला प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतेच राष्ट्रीय सेवा योजने (एनएसएस) अंतर्गत बिलियन हार्ट बीटिंग व अपोलो फाउंडेशन या संस्थेतर्फे एनएसएसच्या ४७ स्वयंसेवकांना बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) प्रशिक्षण देण्यात आले.

अपोलो फाउंडेशनचे विठ्ठल सुर्यवंशी यांनी बेसिक लाइफ सपोर्ट म्हणजे काय? या प्रशिक्षणाची गरज व महत्त्व यांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. तर डॉ. वैभव (एमबीबीएस इमरजन्सी मेडिसिनस यांनी एखादा व्यक्ती किंवा नातेवाईक चक्कर येऊन पडला तर तो कोणत्या कारणामुळे पडला, हे जाणून घेऊन त्याच्यावर वैद्यकीय पथक येईपर्यंत किंवा त्याला डॉक्टरांची ट्रीटमेंट मिळे पर्यंत बेसिक लाइफ सपोर्ट देणे किती आवश्यक व महत्त्वाचे आहे हे प्रॅक्टीकली करून दाखवले व विद्यार्थ्यांकडून ही कृती युक्त सराव करून घेतला.

कार्यक्रमाचे निवेदन ध्वनी सावंत या विद्यार्थिनीने केले तर पाहुण्यांचा परिचय रिया पवार व तेजस वासुकी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नेहल पाटील तर आभार कश्मिरा प्रधान हिने मानले. प्रशिक्षण आम्हा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून आम्ही गरजवंतासाठी त्याचा नक्कीच चांगला उपयोग करू, असे मत आपल्या मनोगतातून तनिषा मोरे हिने मांडले.

एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमासाठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## नाताळनिमित्त उरणच्या बाजारपेठा सजल्या

**उरण : वार्ताहर**

नाताळ सणानिमित्त तयारी सुरू झाली आहे. उरणच्या बाजारात सांताक्लॉज, चॉकलेट, ख्रिसमस ट्री, स्टार, बेल, मास्क, कपडे, टोपी आदी साहित्य विक्रीसाठी आले आहे. येथील शुद्धता माता चर्च येथेही सजावट, विजेची तोरणे, रोषणाई, सजावट काम सुरू आहे.

ख्रिश्चन धर्मियांचा सण नाताळ दरवर्षी २५ डिसेंबरला असतो. तेव्हापासून ते सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करून हा सण साजरा केला जातो. यानिमित्ताने सांताक्लॉजच्या माध्यमातून लहानग्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. याशिवाय भेटवस्तू तसेच गोड म्हणून केक, चॉकलेटचे वाटप करण्यात येते. नाताळ निमित्ताने विशेष मिसा (प्रार्थना) केली जाते सर्व ख्रिती बांधव शुद्धता माता चर्चमध्ये येऊन प्रार्थना करतात. प्रार्थना झाल्यावर सर्व ख्रिती बांधव एकमेकांना नाताळनिमित्त शुभेच्छा देतात, असे उरण येथील शुद्धता माता चर्चचे धर्मगुरू फादर मार्शल लोपीस यांनी सांगितले.

नाताळच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा सजल्या आहेत. यामध्ये खास करून सांताक्लॉजच्या कॅप विक्रीसाठीदाखल झाल्या असून रोषणाईसाठी विविध प्रकारच्या रंगीबेरंगी सजावटीच्या माळा, दिवे, मेरी ख्रिसमस स्टिकरही उपलब्ध आहेत, असे कलश गिफ्टचे राहुल यांनी सांगितले.



## संपादकीय

# राजकीय थयथयाट

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही चालू आहे, त्याला राजकीय थयथयाट या पलीकडे काहीही संबोधता येणार नाही. विशेष म्हणजे हा थयथयाट सत्ताधाऱ्यांकडून होताना दिसत नाही. सत्तेत असलेली भारतीय जनता पक्ष आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेची युती शांतपणे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी धडपडताना दिसते आहे, परंतु महाविकास आघाडीचे नेते मात्र विनाकारण आकांडतांडव करत आहेत. अशा प्रकारचे आक्रस्ताळी राजकारण महाराष्ट्राने पाहिले नव्हते.

**नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होऊन चार दिवस उलटले आहेत, परंतु या चार दिवसांत जनतेचे प्रश्न सोडवण्यात आपण कितपत साह्यभूत ठरलो याचे आत्मपरीक्षण विरोधकांनी करायला हवे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांचे गुरुवारी सभागृहातून निलंबन करण्यात आले. निलंबनाची ही कारवाई आततायीपणाची होती असे म्हणता येणार नाही. कारण जयंतराव पाटील यांनी अध्यक्ष महोदयांना उद्देशून 'असला निर्लज्जपणा तुम्ही करू नका' असे असंसदीय वक्तव्य केलेले सर्वांनीच ऐकले व पाहिले. निर्लज्ज किंवा निर्लज्जपणा हे शब्द सुरुवातीपासूनच असंसदीय मानले जातात. विधिमंडळाचे सभागृह म्हणजे शिवसेनेच्या उरल्यासुरल्या गटाच्या प्रवक्त्याची पत्रकार परिषद नव्हे. सभागृहाचे पावित्र्य जपणे हे प्रत्येक विधानसभा सदस्याचे कर्तव्यच आहे. जयंतराव यांनी काढलेल्या उद्गारांबद्दल विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांना माफी मागावी लागली यातच सारे काही आले. जयंतराव यांच्या निलंबनानंतर विरोधीपक्षाने शुक्रवारच्या संपूर्ण कामकाजावरच बहिष्कार टाकला. हे कशाचे लक्षण आहे? जनतेचे प्रश्न सोडवणाऱ्या कुठल्याही जबाबदार पक्षाने सभागृहाच्या कामकाजाचा वेळ असा वाया जाऊ दिला नसता, परंतु सभागृहात बसण्याऐवजी विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून अचकट-विचकट घोषणाबाजी आणि बॅनरबाजी करण्यातच समाधान मानले. पहिल्या दिवसापासूनच विरोधकांमधील काही आमदार विधानभवनाच्या पायऱ्यांवर वेड्यावाकड्या घोषणा देताना दिसले. आपल्या नाकाखालून सत्ता काढून घेतल्याचा इतका राग या मंडळींच्या मनात आहे की माध्यमांसमोर धिंगाणा घालून तो व्यक्त करण्यापलीकडे त्यांना काही सुचत नाही. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील सीमावाद ४०हून अधिक वर्षे जुना आहे. इतकेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयामध्ये हा वाद गेली अनेक दशके प्रलंबित आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी विनाकारण कुरापत काढून हा सीमाप्रश्न पुन्हा चर्चेत आणला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अत्यंत संवेदनशील पद्धतीने नव्याने उद्भवलेला हा वाद हाताळला व दोन्ही राज्यांच्या नेत्यांना न्यायालयाच्या निर्णयापर्यंत शांत राहण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या सरकारने अमित शहा यांच्या रदबदलीचा सन्मान ठेवून संयमाचे दर्शन घडवले. कर्नाटक विधानसभेने मात्र महाराष्ट्रातील नेत्यांच्या विरोधात आगपाखड सुरू ठेवली. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राच्या विरोधात विधानसभेमध्ये ठरावदेखील मंजूर केला. अशावेळी सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकत्र यायला हवे. एका आवाजात बोलायला हवे. मुख्य म्हणजे संयमाचे दर्शन घडवून प्रगल्भतेचे उदाहरण घालून द्यायला हवे. दुर्दैवाने राजकीय थयथयाटामध्ये दंग झालेल्या विरोधकांना सीमावादातदेखील राजकारण दिसते. नागपूर नजीकच्या हरपूर येथील भूखंड घोटाळाप्रकरणी मुख्यमंत्र्यांचे नाव गोवून विरोधकांनी पराचा कावळा करण्याचा खटाटोप सुरू ठेवला आहे. राजकारण करणे म्हणजे सूड घेणे नव्हे अशा आशयाचे लोकमान्य टिळक यांचे उद्गार गाजलेले आहेत. त्याचे स्मरण नेत्यांनी ठेवले तर फार बरे होईल.**

# ग्राहकाला हवी आपल्या हक्कांची जाणीव

ग्राहक हा बाजारपेठेचा राजा समजला जातो. भारतात २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. इ. स. १९८६ साली २४ डिसेंबर या दिवशी ग्राहक हक्क कायद्याला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली होती. तेव्हापासून २४ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जातो. हा कायदा अस्तित्वात यावा यासाठी अनेक संस्था आणि कार्यकर्त्यांना प्रयत्न केले होते. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येक भारतीय ग्राहकाला ६ हक्क मिळाले आहेत. या हक्कांमध्ये ग्राहकांना एखादी वस्तू किंवा सेवा विकत घेताना त्यांना कोणते अधिकार आणि हक्क आहेत याची माहिती देण्यात आली आहे.

खरं तर प्रत्येक ग्राहकाला आपल्या हक्कांची जाणीव असायला हवी, असं ग्राहक चळवळीचे म्हणणे आहे. ग्राहकांनी नेहमी चिकित्सक असायला हवे. त्यामुळे आपली कोणीही फसवणूक करू शकणार नाही. आज संपूर्ण देशात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जात आहे. याच दिवसाचे निमित्त साधून आपण ग्राहकांच्या हक्कांविषयी जाणून घेणार आहोत.

**सुरक्षेचा हक्क** – आपण एखादी वस्तू विकत घेतो तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी उत्पादकांची असते. आपण ज्या वस्तू विकत घेतो त्याची उपयुक्तता हाच एकमेव निकष नसून त्या वस्तू सुरक्षितदेखील असायला हव्यात. वस्तू विकत घेण्यापूर्वी त्यांच्या गुणवत्तेबाबत तसेच त्या वस्तूवर मिळणाऱ्या सेवांबाबत आग्रही राहण्याचा ग्राहकाला पूर्ण अधिकार आहे. ग्राहकांनी शक्यतो आयएसआय आणि ॲगमार्कचे चिन्ह असलेल्या वस्तूच विकत घ्याव्यात. तसेच या वस्तूंच्या वापरामुळे ग्राहकाला शारीरिक किंवा आर्थिक नुकसान झाले तर कंपनीला त्याची नुकसान भरपाई द्यावी लागते. हा ग्राहकांचा अतिशय महत्त्वाचा हक्क आहे.

**निवड करण्याचा अधिकार** – ग्राहकांना आपल्या आवडीच्या ब्रँडची किंवा आपल्याला जी वस्तू योग्य वाटेल ती विकत घेण्याचा अधिकार आहे. कोणताही दुकानदार तुमच्यावर एखादी विशिष्ट वस्तू विकत घेण्यास दबाव आणू शकत नाही. असं झाल्यास ते ग्राहकाच्या हक्काचे उल्लंघन समजले जाईल.

**माहितीचा हक्क** – ग्राहकांना कोणत्याही उत्पादनाबद्दल माहिती मिळवण्याचा हक्क आहे. या हक्काच्या माध्यमातून ग्राहक त्या उत्पादनाची गुणवत्ता, प्रमाण, संख्या, शुद्धता, किंमत या सर्वांची माहिती मिळवू शकतो. तसेच ग्राहकांना एखादे उत्पादन किंवा सेवा घेण्यापूर्वी त्याविषयी पूर्ण माहिती घेण्याचा अधिकार आहे. हा हक्क कोणताही दुकानदार किंवा व्यावसायिक नाकारू शकत नाही. विशेष म्हणजे ग्राहकांना सोनं खरेदी करण्यापूर्वी त्याची शुद्धता तपासून पाहण्याचा हक्क आहे.

तक्रार करण्याचा आणि निवारण **करून घेण्याचा हक्क** – ग्राहकांना आपली फसवणूक झाली आहे, असं वाटतं असेल, तर त्याला त्याचं म्हणणं योग्य ठिकाणी मांडण्याचा पूर्ण हक्क आहे. ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सरकारने 'तक्रार निवारण केंद्र' आणि 'ग्राहक न्यायालयां'ची स्थापना केली आहे. तसेच ग्राहकांना आपली तक्रार मांडता यावी, यासाठी सरकारने ग्राहक मंचाची स्थापनाही केली आहे. येथे तुम्ही आपली तक्रार मांडू शकता. तसेच ग्राहकाची तक्रार रास्त असेल तर त्या तक्रारीचे निवारण केले जाईल.

**ग्राहक हक्कांच्या शिक्षणाचा अधिकार** – अनेकदा ग्राहकांना आपल्या हक्काची माहिती नसते. त्यामुळे अनेक ग्राहकांची फसवणूक केली जाते. परंतु, सरकारने ग्राहकांना ग्राहक हक्कांच्या शिक्षणाचा हक्कदेखील दिली आहे. यासाठी सरकार नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवत असते. तसेच काही स्वयंसेवी संस्था शिबिरे किंवा कार्यशाळा घेत असतात.

ग्राहकांना वरील सर्व हक्काची जाणीव असणं गरजेचं आहे. अनेकदा ग्राहकांना आपल्या हक्काची माहिती नसल्याने दुकानदारांकडून त्यांची फसवणूक केली जाते. ग्राहकांची फसवणूक झाल्यास तक्रार निवारण केंद्र आहेत. परंतु, ग्राहकांना आपल्या हक्काची माहिती असल्यास प्रशासकीय यंत्रणेवरील तणाव कमी होऊ शकतो.

**(साभार : मराठी लेटेस्टली)**

# ...म्हणून साजरा केला जातो राष्ट्रीय ग्राहक दिन




भारतात दरवर्षी २४ डिसेंबरला राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो. १९८६ मध्ये आजच्याच दिवशी ग्राहक संरक्षण कायदा तयार करण्यात आला. तर, सन १९९१ आणि १९९३ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्याचा जास्तीत जास्त वापर केला जावा म्हणून डिसेंबर २००२ मध्ये पुन्हा या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. यानंतर १५ मार्च २००३पासून या कायद्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. तथापि, या कायद्यात सुद्धा १९८७ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. परंतु, ५ मार्च २००४ रोजी याची संपूर्ण अधिसूचना देण्यात आली.

२०००मध्ये प्रथमच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला होता. आजच्या दिवशी ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची माहिती मिळावी आणि ते याबाबत जागरूक व्हावेत यासाठी अनेक उपक्रम राबवले जातात. तर, दरवर्षी १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा केला जातो.




केंद्र सरकारने यावर्षी जुलैमध्ये ग्राहक संरक्षण कायदा २०१९अंतर्गत नवीन ई-कॉमर्स नियम लागू केले आहेत. वास्तविक, ऑनलाईन शॉपिंगच्या ट्रेंडमुळे हे बदल केले गेले आहेत. ऑनलाईन खरेदी प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात फसवणूकीच्या तक्रारी समोर येत आहेत. हे नवीन नियम ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडील सारख्या ई-कॉमर्स साईटवरही लागू होतील. त्यात ई-कॉमर्स साईटसाठी अनेक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. नवीन नियमांनुसार बनावट व भेसळयुक्त वस्तू विकणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते.ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी हा कायदा अंमलात आला आहे. या कायद्यांतर्गत कोणताही ग्राहक कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक व्यापाराची तक्रार करू शकतो, ज्यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळातील व्यापारांच्या व्यवहाराची हाताळणी लक्षात घेऊनच हा कायदा लागू करण्यात आला होता.

एक नागरिक म्हणून, राज्यघटनेने आपल्याला नागरिकत्वाचे हक्क दिले तसेच, ग्राहक म्हणूनही आपल्याला काही अधिकार देण्यात आले आहेत. त्यातील पहिला आणि सर्वात मोठा हक्क म्हणजे ग्राहकांना दिलेल्या किंमतीच्या समान वस्तू त्यांना मिळाली पाहिजे. वाजवी किंमत आणि शुद्धता या ग्राहकाच्या मुख्य गरजा आहेत. ग्राहकांना त्यांचा हक्क मिळावा यासाठी ग्राहक संरक्षण कायदा बनविला गेला आहे. या कायद्यानुसार आता कोणताही ग्राहक अनुचित व्यापाराची तक्रार करू शकतो. यासाठी त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. पूर्वीच्या काळात व्यावसायिकांच्या व्यवहारात होणारी हेराफेरी लक्षात घेऊनच हा कायदा बनवला गेला आहे.

**(साभार : टीव्ही नाईन मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर ख्रिसमसची टोपी मिळवण्यासाठी भन्नाट फीचर



अलिकडच्य काळात प्रत्येक जण अपडेट राहण्यासाठी प्रयत्न करीत असतो. मोबाईलच्या बाबतीतही तेच होत असते. व्हॉट्सॲप स्टेटसद्वारे तर आपण आज काय केले. काय करीत आहोत हे सर्व अपडेट करण्याची जणू प्रथाच पडली आहे. मग यामध्ये कोणते सण विसरून कसे चालेल, म्हणूनच स्वत: व्हॉट्सॲपनेच येत्या नाताळमध्ये स्पेशल फिचर किंवा इफेक्टद्वारे युजर्सला अपडेट ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

सध्या सर्वत्र नाताळची तयारी सुरू आहे. नाताळनिमित्त वेगवेगळ्या प्रोडक्ट्सवर मिळणारी सुट, वेगवेगळ्या ऑफर्स यांसाठी ग्राहकांमध्ये उत्सुकता असते. यानिमित्त अनेक ॲपवरही अनेक आकर्षक ऑफर्स देण्यात येतात. तर काही ॲप्समध्ये ख्रिसमस थीमवर आधारित आयकॉन किंवा इतर गोष्टींमध्ये बदल करण्यात येतात. असाच बदल व्हॉटसॲपवरही आता उपलब्ध झाला आहे. व्हॉटसॲपवर आयकॉनवर ख्रिसमसची टोपी मिळवता येणार आहे.काही सोप्या स्टेप्स वापरून तुम्ही व्हॉटसॲप आयकॉनवर ख्रिसमसची टोपी मिळवू शकता. ॲड्रॉइड फोनमध्ये लाँचर्सचा वापर करून ॲप आयकॉनमध्ये बदल करता येतो, यातीलच एक लोकप्रिय लाँचर 'नोवा लाँचर'चा वापर करून तुम्ही व्हॉटसॲप आयकॉनवर ख्रिसमसची टोपी मिळवू शकता.

**अशी मिळवा व्हॉटसॲप आयकॉनवर ख्रिसमसची टोपी**

- ख्रिसमस टोपी असणारा व्हॉटसॲप आयकॉन कोणत्याही ब्राऊजरवरून डाऊनलोड करा.
- 'गुगल प्ले स्टोअर'वरून 'नोवा लाँच' इन्स्टॉल करा.
- फोनमध्ये लाँचर सुरू करा.
- व्हॉटसॲप आयकॉनवर काही सेकंद क्लिक करा.
- मेन्युमधील एडिट पर्यायावर क्लिक करा.
- गॅलरीमधील ख्रिसमस टोपी असणाऱ्या व्हॉटसॲप आयकॉनवर क्लिक करा.
- 'सेव चेंजेस' वर क्लिक करा.
- अशाप्रकारे तुम्ही केवळ व्हॉटसॲपच नाही तर इतर कोणत्याही ॲपचे आयकॉन बदलू शकता.

# नामवंत साहित्यिक साने गुरुजी

## निमित्त



पांडुरंग साने यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सदाशिव साने आणि आईचे नाव यशोदाबाई साने होते. त्यांच्या आयुष्यात त्यांच्या आईच्या शिक्षणाचा खूप प्रभाव पडला. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर जे विविध संस्कार केले त्यातूनच गुरुजींचा जीवनविकास झाला. त्यानी इंग्रजी साहित्यामध्ये एम. ए. ही उच्च पदवी मिळवली होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलमध्ये वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली. वसतिगृहात राहूनच त्यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा धडा शिकवला. अमळनेर येथे तत्वज्ञान मंदिरात त्यांनी तत्वज्ञानाचे शिक्षण घेतले.

१९२८मध्ये त्यांनी 'विद्यार्थी' हे मासिक सुरू केले. महात्मा गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. तो खादीचे कपडे वापरायचा. १९३०मध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडली. शिक्षकाची नोकरी सोडल्यानंतर त्यांनी सविनय कायदेभंग उपक्रमात भाग घेतला. त्यांनी 'काँग्रेस'नावाचे साप्ताहिक काढले. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशन (१९३६) यशस्वी होण्यासाठी त्यांनी खूप काम केले. इ.स. १९४२च्या चळवळीत भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला. फैजपूर येथील अधिवेशनात महात्मा गांधींच्या विचारसरणीस अनुसरून त्यांनी 'मैला वाहणे' व ग्राम स्वच्छतेची इतर कामे केली.

साने गुरुजी यांनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. 'पत्री' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातून साने गुरुजीच्या देशभक्तिपर कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यातील बलसागर भारत होवो सारख्या कवितांचा नागरिकांवरील वाढता प्रभाव लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त केल्या.

१९३०मध्ये साने गुरुजी त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होते. त्यावेळी दक्षिणेकडच्या अनेक भाषिकांशी त्यांचा संबंध आला. अनेक भाषांचे वैभव आपल्याला अज्ञात असल्याचे त्यांना जाणवले. आपण भारतात राहत असूनही इथल्या वेगवेगळ्या प्रांतांत बोलल्या जाणाऱ्या भाषांची माहिती आपल्याला नसते; या भाषा शिकायच्या असल्यास तशी संस्थाही आपल्याकडे नाही याची खंत नेहमी साने गुरुजींना वाटायची. यातूनच 'आंतरभारती'ची संकल्पना त्यांना सुचली.

साने गुरुजी यांनी आपल्या आयुष्यातली शेवटची अनेक वर्षे रत्नागिरी जिल्ह्यातल्या हर्णैजवळच्या आपल्या मूळ गावी-पालगड गावी काढली. तेथे त्यांचे राहते घर आजही चांगल्या प्रकारे ठेवले आहे ते ज्या शाळेत जात होते ती प्राथमिक शाळाही आज चालू आहे. पालगड हे मंडणगडनजीक दापोली तालुक्यात दुर्गम भागात आहे. जाणते पर्यटक या गावाला व घराला आवर्जून भेट देतात. ११ जून, इ.स. १९५० रोजी त्यांनी आत्महत्या केली.

साने गुरुजींची पुतणी सुधाताई बोहोडा यांनी साने गुरुजींचे हे राहते घर राष्ट्राला अर्पण केले. त्यानंतर या घराची देखभाल वडघरचे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ही संस्था करत आली आहे.

**(साभार : वेबदुनिया)**

## क्लिक...क्लिक...!



**खारघर : नाताळ सणानिमित्त बहुतांश शाळांना सुटी लागली आहे. त्यामुळे सेंट्रल पार्क येथील खारघर हिल परिसरात लहान मुले खेळाचा आनंद घेत आहेत.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# आरोग्यासाठी धोकादायक ताण असा करा दूर

आजकालच्या धावपळीच्या जीवनात अनेक लोक तणावाशी झुंजत असतात. तणावामुळे शारीरिक आरोग्याचे खूप नुकसान होते. तणाव वाढला तर मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य बिघडू लागते. अनेक वेळेस असे होते की एखादी व्यक्ती तणावात असली तरी त्याची लक्षणे त्यांना समजत नाहीत. तणाव वाढल्यावर काय होते, हे जाणून घेऊया.



डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, आपल्या जीवनातील कोणताही मोठा बदल हा तणावाचे कारण बनू शकतो. जर आपल्या जीवनात काहीतरी बदलले असेल आणि आपण ते स्वीकारू शकत नसू तर त्यामुळेही तणाव वाढू शकतो.

**तणाव दीर्घकाळापर्यंत राहू शकतो** – तणाव हा अल्पकालीन आणि दीर्घकालीन असतो. थोड्या काळासाठी असलेल्या तणावाला अल्पकालीन म्हटले जाते, या परिस्थितीमध्ये झोप कमी होते तसेच भुकेचा पॅटर्नही बदलतो. पण दीर्घकालीन तणाव हा खूप धोकादायक ठरू शकतो. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्तीचे मानसिक आरोग्य बिघडू शकते. त्या व्यक्तीचा स्वभाव बदलतो आणि क्वचित त्या व्यक्तीच्या मनात नशेचे किंवा आत्मघाताचे विचारही येऊ शकतात.

**कोरोनानंतर वाढली समस्या** – काहीवेळा विनाकारण तणाव निर्माण होऊ लागतो. हे भीतीमुळे किंवा अस्वस्थतेमुळे होते. त्याचा शरीरावर खूप परिणाम होतो. कोरोना महामारीनंतर ही समस्या खूप वाढली आहे. अनेक लोकांमध्ये चिंता आणि नैराश्याची लक्षणे दिसून येत आहेत.

**तणाव कमी करण्याचे मार्ग** – प्रत्येक व्यक्तीने कमीत कमी आठ तासांची पुरेशी झोप घेतली पाहिजे. झोप ही आपले शरीर आणि मन दोन्हीसाठी चांगली ठरते. झोप आपल्या शरीराची दुरुस्ती करण्यास आणि तणावाचे शरीरावर होणारे परिणाम कमी करण्यास मदत करते.

- सुसंगती पाळावी,रोज रात्री एक निश्चित वेळा ठरवून झोपा आणि सकाळी उठण्याचीही निश्चित वेळ पाळा.
- झोपताना खोली शांत आहे याची खात्री करा
- बेडरूममध्ये टीव्ही, कॉम्प्युटर आणि स्मार्ट फोन यांसारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे ठेवू नयेत.
- झोपायच्या आधी जास्त खाणे, कॅफेनचे सेवन करणे तसेच धूम्रपान व मद्यपान करणे टाळावे.
- रोज थोडा व्यायाम करा. दिवसा शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहिलात तर रात्री सहज झोप येईल.
- चांगले, ताजे व पौष्टिक अन्न खा.
- योगासने व मेडिटेशन करा.

# रायगड जिल्ह्यात रस्ते अपघातात वर्षभरामध्ये १३९ जणांचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गतवर्षाच्या तुलनेत या वर्षी महामार्गावरील अपघातांमध्ये वाढ झाली आहे. रस्ता अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या आणि जखमी होणाऱ्यांची संख्या वाढली आहे. वर्षभरात रायगड जिल्ह्यात महामार्गांवर झालेल्या अपघातात १३९ जणांचा मृत्यू झाला तर २६४ जण गंभीर जखमी झाले.

रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या हद्दीत २०२१ मध्ये ३५४ अपघातांची नोंद झाली होती. त्यात १२४ जणांचा मृत्यू झाला होता तर १८४ जण गंभीर जखमी झाले होते. यातुलनेत २०२२ मध्ये ३६५ अपघातांची नोंद झाली. या अपघातांमध्ये १८४ जणांचा बळी गेला तर २६४ जण गंभीररित्या जखमी झाले.




रायगड जिल्ह्यातून तीन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग जातात. यात मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि मुंबई-पुणे महामार्ग क्रमांक ४ या राष्ट्रीय महामार्गांचा समावेश आहे. वर्षभरात मुंबई-गोवा महामार्गावर १६८ अपघात झाले, त्यात ५६ जणांचा मृत्यू झाला. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ११९ अपघात झाले. त्यात ५२ जणांचा मृत्यू झाला. मुंबई-पुणे महामार्ग ४ या महामार्गावर ७८ अपघात झाले, त्यात ३१ जणांचा मृत्यू झाला.

अरुंद रस्ता, नागमोडी वळणे, तीव्र उतार आणि वाहन चालकांचा बेदरकारपणा ही या अपघातांमागची प्रमुख कारणे आहेत. तर द्रुतगती मार्गावर लेनची शिस्त न पाळणे, वेग मर्यादा न पाळणे, गाड्यांचे टायर फुटणे ही अपघातांमागची प्रमुख कारणे आहेत. या शिवाय दारू पिऊन गाडी चालवणे, चुकीच्या पध्दतीने ओव्हरटेकींग करणे यामुळेही अपघात होत आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ट्रक चालकांकडून घाट उतारावर वाहने न्यूट्रल गेअरवर चालवली जातात. ज्यामुळे वाहनांवरील ताबा सुटतो आणि अपघात होतात.

# भाजप नेते ॲड. चेतन पाटील यांच्याकडून मुरूडमधील मासळी शेडची पाहणी

**मुरुड : प्रतिनिधी**



भाजप आमदार रमेश पाटील यांनी दिलेल्या आमदार निधीतून मुरूड मासळी मार्केटच्या पाठिमागील शेड नव्याने बांधण्यात येत आहे. हे काम तत्परतेने मार्गी लागण्यासाठी भाजप मच्छीमार सेलचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. चेतन पाटील यांनी शुक्रवारी (दि. २३) या ठिकाणी भेट देऊन कामाची पहाणी केली. व ठेकेदाराला लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.





चक्रीवादळात मुरुडमधील मासळी लिलावाची शेड जमिनदोस्त झाली होती. त्यामुळे स्थानिक मच्छिमारांना समुद्रातून मिळाली मासळी लिलाव करण्यासाठी आसरा राहिला नव्हता. नवीन शेड उभारण्यासाठी निधी मिळावा, अशी मागणी येथील मच्छिमार संघांनी आमदार रमेश पाटील यांच्याकडे केली होती. त्यानुसार आमदार पाटील यांनी १६ लाखाचा निधी दिला आहे. या निधीतून मुरूड मासळी मार्केटच्या पाठिमागे नव्याने शेड उभारण्यात येत आहे.

मात्र हे काम मंदगतीने सुरु होते. ॲड. चेतन पाटील यांनी शुक्रवारी या कामाची पाहणी केली. व जानेवारी महिन्याचा अखेरपर्यंत हे काम पूर्ण करावे, अशी सूचना ठेकेदाराला केली. या वेळी सागर कन्या मच्छिमार संघाचे चेअरमन मनोहर बैले, प्रकाश सरपाटील, महेंद्र गार्डी, राजन चुनेकर, ताराचंद कोंडे, दीपक गोसावी, गोगर गुरुजी यांच्यासह मच्छीमार उपस्थित होते.

# रायगड जिल्हा परिषद, स्वदेश फाउंडेशनतर्फे शाळांचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व स्वदेश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २३) जिल्हा परिषदेच्या स्व. ना. ना. पाटील सभागृहात सक्षम शाळा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. या वेळी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व खासगी माध्यमिक शाळांचा सन्मान करण्यात आला.

शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, शाळेचा परिसर स्वच्छ व पर्यावरणपूरक करणे, विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान देणे यासह इतर शैक्षणिक उपक्रमांचा यात सहभाग आहे. या उपक्रमांना स्वदेश फाउंडेशनचे सहकार्य लाभले. या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक १२६ शाळांनी सहभाग नोंदविला होता. त्यामधील २६ शाळांचा शुक्रवारी सन्मान करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, स्वदेश फाउंडेशनच्या ट्रस्टी झरीना स्क्रूवाला, मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांच्यासह जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकारी, फाऊंडेशन सदस्य व मुख्याध्यापक उपस्थित होते.



माध्यमिक विभागात तळा तालुक्यातील अभिनव ज्ञानमंदिर-उसर शाळेने प्रथम क्रमांक मिळविला या शाळेला पाच लाख रुपये रक्कम चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर माणगाव तालुक्यातील टाटा विद्यालय-मिरा शाळेने द्वितीय क्रमांक मिळविला. या शाळेला तीन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल तळा तालुक्यातील एस. एस. निकम इंग्लिश मिडीयम स्कूल शाळेला दोन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

प्राथमिक विभागात रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांचा गौरव करण्यात आला. माणगाव तालुक्यातील रानवडे शाळेने प्रथम क्रमांक मिळविला या शाळेला तीन लाख रुपये रक्कम चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर माणगाव तालुक्यातील भाले शाळेने द्वितीय क्रमांक मिळविला. या शाळेला दोन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल पोलादपूर तालुक्यातील सडवली व महाड तालुक्यातील सुतारकोंड या शाळांना एक लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर उत्तेजनार्थ जिल्हा परिषदेच्या पाच शाळांना ५० हजार रुपये चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर उर्वरित १४ शाळांना चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**स्वदेश फाउंडेशनने जिल्ह्यात विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांमध्ये यापुढे जास्तीत जास्त शाळांनी सहभाग नोंदवावा. ज्ञानासोबत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. जिल्ह्यात दर शनिवारी दप्तराविना शाळा उपक्रमातून विद्यार्थ्यांचे कलागुण जपले जात आहेत.**

**-डॉ. किरण पाटील,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**रायगड जिल्हा परिषद**

# अबॅकस परीक्षेत रायगडच्या मुलांचे उज्ज्वल यश

**माणगाव : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना गणितीय आकडेमोड जलद गतीने करता यावी, यासाठी अबॅकस तर्फे टॅलेंट सर्च परीक्षा घेतली जाते. नॅशनल यंग अबॅकसच्या टॅलेंट सर्च २०२२ या परीक्षेत रायगडच्या तेरा विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई केली आहे.

माणगाव येथील सुधाकर नारायण शिपुरकर स्कूलमध्ये ११ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेच्या जिल्हास्तरीय फेरीत रायगडमधील पल्लवी क्लासेसचे १९२ पैकी ७२ विद्यार्थी पात्र ठरले. तर १८ डिसेंबर रोजी डोंबिवलीतील चंद्रेश लोढा मेमोरियल स्कूलमध्ये घेतलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत पल्लवी क्लासेसच्या २९ मुलांपैकी जय मोरे, स्वराज माळी (माणगाव), अभय शिंदे, अमेय मोरे, अहमद गोडमे (महाड), अर्श अग्रवाल, मृण्मयी जोशी (निजामपूर), यांनी सुवर्ण तर कादंबरी मोरे (महाड) आणि कनक जैन (माणगाव) यांनी रौप्य आणि प्रिशा गोविलकर, चेतना मुधोळकर (माणगाव), पूर्वश्री एन आणि लव्या जैन (महाड) यांनी कांस्यपदक मिळवले. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



(छाया : सलीम शेख)

# नाताळ साजरा करण्यासाठी अलिबागला पसंती

**अलिबाग : प्रतिनिधी**

नाताळ साजरा करण्यासाठी पर्यटकांनी अलिबागला पसंती दिली आहे. अलिबाग शहर आणि आसपासच्या परिसरातील हॉटेल्स, ग्रामीण भागातील कॉटेजेसची बुकिंग फुल्ल झाली आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायिक सध्या खुश आहेत.

नाताळ साजरा करण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटक अलिबागला येत असतात. कोविडमुळे दोन वर्षे पर्यटक येऊ शकले नव्हते. यंदा कोविडची बंधने नाहीत. त्यामुळे पर्यटक नाताळच्या सुट्टीत बाहेर पडले आहेत. मुंबई, पुणे, ठाणे या शहरांपासून कोकणातील रायगड जिल्हा जवळ असल्यामुळे पर्यटकांनी यंदादेखील अलिबागला पसंती दिली आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वीच अलिबाग शहरातील तसेच आसपासच्या परिसरातील हॉटेल्स् आणि कॉटेजेस् आरक्षित केले आहेत.

मांडवा, आवास, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागांव, काशिद, मुरूड, दिवेआगार, श्रीवर्धन, हरिहरेश्वर हे समुद्र किनारे पर्यटकांच्या पसंतीची ठिकाणे आहेत. सुट्टीत पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक या समुद्र किनाऱ्यावर आले आहेत. त्यामुळे या परिसरातील हॉटेल व्यावसायिक, कॉटेजेस यांचा धंदा सध्या तेजीत आहे.



**सध्या पर्यटक अलिबागला येत आहेत. मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा रूमसाठी जास्त चौकशी होत आहे. कॉटेजेस महिनाभरापूर्वीच आरक्षित झाली आहेत. पर्यटक जास्त येत असले तरी आम्ही कॉटेजच्या भाड्यात वाढ केलेली नाही.**

**-उज्वल म्हात्रे, कॉटेज मालक, वरसोली, ता. अलिबाग**

मुंबईहून सागरी सफर करीत अलिबागला पोहोचता येते. तिथून पुढे रायगडमधील अन्य ठिकाणी जाता येते. या प्रवासाची गंमत वेगळी आहे. अलिबागसह मांडवा, नागाव, काशिद, मुरूड, दिवेआगरच्या किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी होत आहे.

## जाहीर नोटीस

प्रो. जमा

मा.गुन्नाल साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील
ॲड. जे.बी. आपटे

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात दिवाणी चौकशी अर्ज क्र. २३२/२०१८**

नि. २५/ड
ने. ता.१८/०१/२३

१. सौ. स्नेहा संजय वैद्य
वय वर्षे सु. ५४, धंदा – घरकाम,
रा. श्रीमंगल कार्यालय साळगांवकर कंपाऊंड,
गणपती मंदीर जवळ, मु.पो. ता. दापोली,
जि. रत्नागिरी
२. सौ. सुचेता संजय जोशी
वय वर्षे सु. ५६, धंदा – घरकाम,
रा. यशवंत/३ ब, ओम सिध्दराज
को. ऑप. सोसायटी, अभिनव नगर जवळ,
बोरीवली पूर्व, मुंबई
**अर्जदार**

**विरुध्द**

कोणीही नाही .................................. **सामनेवाले**

ज्याअर्थी कै. विष्णु गणेश बापट हे दिनांक २९/०९/१९७१ रोजी व कै. नरसिंह विष्णु बापट हे दिनांक १२/११/२००६ रोजी मुंबई येथे मृत्युपावले असुन अर्जदार स्नेहा संजय वैद्य व सुचेता संजय जोशी रा. अनुक्रमे दापोली, जि.रत्नागिरी व बोरीवली पुर्व मुंबई यांनी कोर्टास सदरहु मयत विष्णु गणेश बापट व मयत नरसिंह विष्णु बापट यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसांचे सर्टीफिकेट मिळावे म्हणुन अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – शिरवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र एकर गुंठे | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ३० नवीन गट नं.२५ | – | ३०-३७-० पो.ख. ७-३-० एकूण ३८-०-० | २४-१४ |
| २ | २५ | २ | १२-०-० | २२-८७ |
| ३ | २९ | – | २८-२८-० पो.ख. ६-२१-० एकूण ३४-४९-० (३५-९-०) | १८-१२ |
| ४ | ३४ | – | ३४-२४-० पो.ख. ८-०-० एकूण ४२-२४-० | २२-१२ |
| ५ | ४६ | २ | ०-१४-० पो.ख. ०-२-० एकूण ०-१६-० | ०-४-० |
| ६ | ३२ | – | १६-३९-० पो.ख. ३-३६-० एकूण २०-३५-० | १०-१४ |
| ७ | ७४ | १ | ०-३६-० पो.ख. ०-१-० एकूण ०-३७-० | ०-१४-६ |
| ८ | ३१ | – | २२-३४-० पो.ख. ०-२९-० एकूण २३-२३-० | २०/१२ |
| ९ | १३ | – | ०-९-० | ०-३-६ |
| १० | ६४ | – | ०-२४-० | ०-१० |
| | **मौजे वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड** | | | |
| ११ | १३७ | ७ | ०-३५-० | ०-१५-० |
| १२ | १०८ | २ब | ०-२०-० | १-८ |
| १३ | १११ | १ब | १-०-० | ३-१२ |
| १४ | ११० | १ब | ३-११-० | ११-१० |
| १५ | ८६ | – | ०-२३.५-० पो.ख. ०-१.२५-० एकूण ०-२४.७५-० | २-१५ |
| १६ | ८३ | १ब | ३-२२-० पो.ख. ०-७.२५-० एकूण ३-२९.२५-० | ६-१४ |
| १७ | ८७ | ४ | ७-२४.५-० पो.ख. ०-७.५-० एकूण ७-३२-० | ११-११ |
| १८ | १०२ | ३ | ५-१२-० पो.ख. ०-१.७५-० एकूण ५-१३.७५-० | १४-१२ |
| १९ | ७९ | ३ | ०-३९.२५-० | ४-१ |
| २० | ७९ | २ | ०-२.५-० | २-६ |
| २१ | ७१ | १० | ४-८-० पो.ख. ०-१६-० एकूण ४-२४-० | ७-७ |
| २२ | ९९ | १अ/२ | २-२२-२ पो.ख. २-२२-२ एकूण ५-१९.५०-० | १९-०-६२ |
| २३ | ६५ | १ | ०-६-० पो.ख. ०-२.२५-० एकूण ०-८.२५-० | ०-१-६ |
| २४ | ६९ | २ | १-१-० | ०-१५-० |
| २५ | १११ | १अ | ६-९.५-० पो.ख. ०-१-० एकूण ६-१०.५-० | २३-१० |
| २६ | ८० | – | ०-८-० | ०-८ |
| २७ | ८४ | – | ५-३५.७५-० | १५-११ |
| २८ | १०० | – | ३-१-० पो.ख. ०-१.५-० एकूण ३-२.५-० | १५-४ |
| २९ | ९९ | १ब | १-०-० | ३-९ |
| ३० | ९७ | – | ५-३८.२५-० पो.ख. ०-४.५०-० एकूण ६-२.७५-० | १८-६ |
| ३१ | ९६ | – | ६-६.७५-० | १४-१२ |
| ३२ | ११२ | – | ५-३६.५-० | २२-२ |
| ३३ | ९५ | २ | ०-२६.५०-० पो.ख. ०-१-० एकूण ०-२७.५०-० | ५-५ |
| ३४ | ९५ | १ | १-७.५०-० पो.ख. ०-३-० एकूण १-१०.५०-० | ७-१० |
| ३५ | ७९ | १ | ३-२३.५०-० पो.ख. ०-१४.७५-० एकूण ३-३८.२५-० | २१-७ |
| ३६ | ९४ | २ | ०-२५-० पो.ख. ०-१-० एकूण ०-२६-० | ५-०-० |
| ३७ | १५३ | ५ | ०-३५-० पो.ख. ०-२.७५-० एकूण ०-३७.७५-० | ३-१४ |
| ३८ | ८२ | १ | १-८-० पो.ख. ०-२.७५-० एकूण १-१०.७५-० | ५-१३ |
| ३९ | ८४ | – | ५-३५.७५-० | १५-११ |
| ४० | ८३ | १अ | ६-३३.७५-० पो.ख. ०-२३-० एकूण ७-१६.७५-० | १७-५ |
| ४१ | ८२ | ३ | ०-१३.७५-० | ०-११-६ |
| | **मौजे वांगणी, ता. पनवेल, जि. रायगड** | | | |
| ४२ | २० | – | ५-२६-० पो.ख. १-४-० एकूण ६-३०-० | ५-१० |
| ४३ | २२ | २ | ३४-११-० पो.ख. ७-२७-० एकूण ४१-३८-० | २७-३ |
| ४४ | १९ | – | १-२१.५-० पो.ख. ०-५.५-० एकूण १-२७-० | ७-१३ |
| ४५ | १२ | ६ | ११-२२-० पो.ख. २-४-० एकूण १३-२६-० | ७-१५ |
| ४६ | ११ | २ | २-२६-० पो.ख. ०-१२.५०-० एकूण २-३८.५-० | ११-६ |
| ४७ | ५३ | – | २-१-० | १-१२ |
| ४८ | ५० | – | २५-३५-० पो.ख. ७-१०-० एकूण ३३-५-० | १३-११ |
| ४९ | ४६ | – | २०-१८-० पो.ख. २०-१८-० एकूण ४०-३६-० | १३-१ |
| ५० | ४९ | १ | ४-९.७५-० पो.ख. ०-३३-० एकूण ५-२.७५-० | २६-१३-६ |
| ५१ | ४५ | – | ०-२८.५-० पो.ख. ०-२१-० एकूण १-९.५-० | १-१२ |
| ५२ | ४४ | – | १२-२३-० पो.ख. १२-२२-० एकूण २५-५-० | ७-१५ |
| ५३ | ३६ | – | २-१९.५-० पो.ख. ०-१०.७५-० एकूण २-३०.५-० | १८-१५ |
| ५४ | ३७ | – | ०-१८-० पो.ख. ०-१-० एकूण ०-१९-० | १-५ |
| ५५ | ३५ | – | ४१-७-० पो.ख. १३-२९-० एकूण ५४-३६-० | ३२-१४ |
| ५६ | ३४ | – | ०-६.७५-० पो.ख. ०-०.२५-० एकूण ७-०-० | ०-६-० |
| ५७ | ३३ | – | २-०.२५-० पो.ख. ०-६.७५-० एकूण २-७-० | ६-६ |
| ५८ | ३२ | – | ०-१२-० | १-१ |
| ५९ | ३० | – | ०-८.५०-० | ०-१२ |
| ६० | ३१ | ३अ | २-२-० पो.ख. ०-३८-० एकूण ३-०-० | १७-६ |
| ६१ | ७७ | – | ३८-२१-० पो.ख. १२-३३-० एकूण ५१-१४-० | ३०-१२ |
| ६२ | ७८ | – | ३६-२०-० पो.ख. १६-१५-० एकूण ५२-३५-० | २९-३ |
| | **मौजे मोहोदर, ता. पनवेल, जि. रायगड** | | | |
| ६३ | ६४ | ३ | ०-२-० पो.ख. ०-०.२५-० एकूण ०-२.२५-० | ०-१ |
| ६४ | ५७ | ३ | ०-१.७५-० पो.ख. ०-०.२५-० एकूण ०-२-० | ०-२ |
| ६५ | १५१ | – | २-२१-० पो.ख. ०-१४-० एकूण २-३५-० | २-३ |

त्यापेक्षा सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीरनोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजुन हे कोर्ट सदरहु अर्जदाराला त्याचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत विष्णु गणेश बापट व नरसिंह विष्णु बापट यांचे वारसाचे सर्टीफिकेट देण्यात येईल. तारीख ०३ माहे डिसेंबर सन २०२२

**सही/-**
**क. लिपिक**

**शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल

# अधिवेशनात आमदार नाईक यांनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांना फोडली वाचा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ऐरोली विधानसभेचे आमदार लोकनेते गणेश नाईक यांनी बुधवारी (दि. २१) राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये नगर विकास खात्यावरील पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चर्चा करताना नवी मुंबईकरांना मालमत्ता करमाफी देण्याची आग्रही मागणी केली. त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांची गरजे पोटीची बांधकामे नियमित करताना एकच दर आकारण्याची मागणी केली. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात आमदार नाईक यांनी नवी मुंबईतील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा आणि प्रकल्पग्रस्तांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न पोटतिडकीने मांडले.



या विषयांबाबत लोकनेते आमदार नाईक यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत पत्रव्यवहारही केला आहे. त्यामुळे या मागण्या मान्य होण्यासंदर्भात सकारात्मक वातावरण आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटापर्यंतच्या निवासी घरांना संपूर्ण मालमत्ता कर्जमाफी आणि ५०१ ते ७०० चौरस फुटापर्यंतच्या निवासी घरांना मालमत्ता करामध्ये ६० टक्के सवलत देण्याची मागणी लोकनेते आमदार नाईक यांनी केली. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या महापालिकांनी मालमत्ता कर माफी देण्याचे आवाहन राज्य शासनाने केले होते. या आवाहनानुसार सर्वात प्रथम १९ जुलै २०१९ रोजी नवी मुंबई महापालिकेच्या सर्व साधारण सभेने मालमत्ता कर माफीचा ठराव करून तो राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवला होता. परंतु, अद्यापही तो मंजूर झाला नसल्याचे लोकनेते नाईक यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली. याउलट मुंबई महापालिकेने १ जानेवारी २०२२ रोजी यासंबंधीचा ठराव केल्यावर हा ठराव २७ मे २०२२ रोजी राज्य शासनाने मंजूर देखील केला. नवी मुंबई पालिकेने सादर केलेला संपूर्ण मालमत्ता कर माफीचा ठराव मंजूर करून शासनाने नवी मुंबईकरांना न्याय द्यावा. तसेच आ. नाईक यांच्या नेतृत्वामुळे महापालिकेच्या माध्यमातून मोरबे धरण नवी मुंबईसाठी विकत घेण्यात आले. या धरणामुळे नवी मुंबई शहर पाणीपुरवठ्याबाबत स्वयंपूर्ण झाले, परंतु नवी मुंबईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २०२५ पर्यंत लोकसंख्येला पुरेल असे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले होते परंतु आताच पाण्याची कमतरता जाणवते आहे. त्यासाठी वेळीच वाढीव पाणीपुरवठ्याची तरतूद करण्याची गरज आहे. जिल्ह्यातील भीरा नदीवर २००० एमएलडी क्षमतेचा पाणीपुरवठा प्रकल्प नवी मुंबईसाठी राबविण्याची मागणी लोकनेते नाईक यांनी केली. या प्रकल्पाला दोन हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये १००० एमएलडी पाणी नवी मुंबई शहरासाठी वापरता येईल आणि उर्वरित १००० एमएलडी पाणी उर्वरित शहरांसाठी देता येईल, अशी सूचना त्यांनी केली आहे. दरवर्षी समुद्रात जाणारे भिरा नदीचे पाणी या पाणीपुरवठा प्रकल्पामुळे नागरिकांना पिण्यासाठी वापरता येणार आहे. या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी राज्य शासनाने निधीची तरतूद केल्यास आनंदच होईल किंवा शासनाने नवी मुंबई पालिकेला हा पाणीपुरवठा प्रकल्प राबविण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी लोकनेते आमदार नाईक यांनी केली.

### भूमिपुत्रांना नवी मुंबई पालिका सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्या

**नवी मुंबईच्या निर्मितीसाठी स्थानिक भूमिपुत्रांनी त्यांच्या जमिनीचा त्याग केला आहे. महापालिकेच्या सेवेमध्ये त्यांना प्राधान्याने सामावून घेतले पाहिजे. अलीकडेच महापालिका प्रशासनाने बारवी धरणग्रस्तांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याचा प्रस्ताव केला आहे, परंतु शहरातील ३०० सिडको आणि एमआयडीसी प्रकल्पग्रस्त अद्यापही कायम होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. ठोक मानधन, कंत्राटी तत्त्वावर ही मंडळी वर्षानुवर्ष काम करीत आहेत. या प्रकल्पग्रस्तांनाही तातडीने पालिकेच्या कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली.**

### विविध प्रश्न सभागृहात मांडले

**घणसोली-ऐरोली पामबीच मार्गासाठी निधी द्या. तुर्भे-खारघर भुयारी मार्गाचे काम हाती घ्या. प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटीची घरे एकसमान दराने नियमित करावी. युनिफाईड डीसीआरचे अधिकार सिडकोऐवजी महापालिकेला द्यावेत. महापालिकांमध्ये शिक्षण मंडळांची पुनर्स्थापना करा. नवी मुंबई (महापे) ते विक्रोळी उड्डाणपुलाचे काम सुरू करा. ऐरोली-काटई उड्डाणपुलावरील नवी मुंबईसाठीच्या दोन मार्गीका पूर्ण करा, असे विविध प्रश्न आमदार गणेश नाईक यांनी अधिवेशनात मांडले.**

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई

## नवी मुंबईच्या तुर्भे येथे साठा जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुक्त नवी मुंबई शहर हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती, प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांच्या वापराची सवय नागरिकांना लागावी यादृष्टीने मार्केट्समध्ये कापडी पिशव्यांचे विनामुल्य वाटप असे उपक्रम राबविण्याबरोबरच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाया मोठ्या प्रमाणावर राबविल्या जात आहेत.



अशाच प्रकारची प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांवरील धडक कारवाई करीत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे आणि त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांसमवेत तुर्भे येथे दोन टन ३० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला तसेच ५० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. १० दिवसांपूर्वीच तुर्भे विभागातूनच एक टन २०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले होते. त्यानंतर त्याच विभागात ही दुसरी मोठी कारवाई करण्यात आलेली आहे.

या कारवाईमध्ये तुर्भे येथील मसाला मार्केट मधील विधी प्लास्टिकचे गोडाऊन, ग्रोमा सेंटरमधील गाला ब्रदर्स, जयेश कुमार, सिंघवी प्लास्टिक या व्यावसायिकांवर दुसऱ्यांदा प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापराचा गुन्हा दाखल झाल्याने प्रत्येकी १० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. त्याचप्रमाणे त्यांच्याकडील प्लास्टिक पिशव्यांचा साठाही जप्त करण्यात आला व त्यांस समज देण्यात आली.

याचप्रमाणे तुर्भे येथील मर्चंट सेंटर मधील न्यू मार्ट आणि ओम फरसाण मार्ट या दोन दुकानांमध्ये प्लास्टिक पिशव्या आढळल्याने पहिला गुन्हा म्हणून त्यांच्याकडून प्रत्येक पाच हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

याप्रमाणेच २१ डिसेंबरला सेक्टर १९ तुर्भे येथील थर्माकोल गोडाऊनवर अचानक छापा टाकत २३९ बॉक्स जप्त करीत त्यात असलेले साधारणत: ३५० किलो वजनाचे थर्माकोल जप्त करण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून १० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कमही वसूल करण्यात आली.


### नागरिकांना आवाहन

**प्रतिबंधात्मक प्लास्टिकला नवी मुंबई महापालिका क्षेत्रातून हद्दपार करणे हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून नवी मुंबई महापालिका जनजागृती आणि प्रतिबंधात्मक कारवाया या दोन्ही माध्यमांतून प्रयत्न करीत असून सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून संपूर्ण सहकार्य करावे असे, आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.**

# वाशी रेल्वेस्थानकातील शौचालयात चक्क पाणीपुरीचे सामान

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी रेल्वेस्थानकाच्या टॉयलेटमध्ये पाणीपुरीचे सामान ठेवण्यात येत असल्याची घटना उघडकीस आली आहे. एका सतर्क नागरिकाला हे दृश्य दिसून आल्यावर त्याने व्हिडिओ काढला. या वेळी त्या नागरिकाला संबंधित पाणी पुरी स्टॉल असलेल्या व्यक्तीकडून रोखण्याचा प्रयत्न झाला, मात्र तरीही ना घाबरता या सतर्क नागरिकाने व्हिडिओ काढला. त्यामुळे या प्रकाराची तपासणी करण्याची मागणी वाढू लागली आहे.



पाणी पुरी अथवा सोडा वॉटर मशीनमध्ये शौचालयाचे पाणी वापरले जात आहे का असा प्रश्न या निमित्ताने पुढे आला आहे. यातून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील उभा राहिला ठाकला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या फेरीवाल्यांवर तसेच त्यांना परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होऊ लागली आहे. तर दुसरीकडे सिडकोकडून या रेल्वे स्थानकांची मालकी असल्याने त्यांच्याकडून अनेक कामांचे कंत्राट दिले जाते त्यानुसार या शौचालय सांभाळण्याचे कंत्राटदेखील दिले आहे. याबाबत सिडको शौचालय सांभाळणाऱ्या कंत्राटदारावर काय कारवाई करणार ते पाहावे लागणार आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मॉनिटरिंग सेशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २३) सॉफ्ट स्किल वरती मॉनिटरिंग सेशनचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. स्वाती डुंबरे (सहाय्यक संचालक डेजाविल स्किल) व अश्विनी रानडे (सॉफ्ट स्कील कोच) मुंबई हे उपस्थित होते.



या सत्रामध्ये प्रमुख वक्त्यांनी महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना संभाषण कौशल्यै, व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व गुण, निर्णय क्षमता या सर्व कौशल्यांचा विकास करणे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या सत्रासाठी महाविद्यालयातील सुमारे ६० विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सत्राचा लाभ घेतला. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना सत्रासाठी उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. रूपाली नगारेकर (समन्वयक कौशल्य विकास कक्ष) यांनी केले तसेच प्रा. धनवे आवटे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रेरणा सातव, प्रा. श्वेता श्रीवास्तव व सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# बीपीएमएस ऑनलाईन कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या बांधकाम परवानग्या ऑनलाईन पध्दतीने दिल्या जाव्यात अशा प्रकारचे निर्देश नगरविकास विभागामार्फत देण्यात आले आहेत. याकरिता शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत बीपीएमएस ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीचा उपयोग करून ऑनलाईन बांधकाम परवानगी देण्याच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आलेली आहे.

कार्यप्रणाली वास्तुविशारद आणि विकासक यांच्याकडून नियमितपणे राबविली जावी यादृष्टीने विविध स्तरांवरून प्रयत्न करण्यात येत असून या प्रणालीव्दारे ऑनलाईन बांधकाम परवानगी प्राप्त करण्याच्या कार्यप्रणालीत वापरकर्त्यांना जाणविणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार नगररचना विभागामार्फत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात झालेल्या कार्यशाळेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १२० हून अधिक वास्तुविशारद व विकासक सहभागी झाले होते. महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी प्रास्ताविकपर मनोगतात कार्यशाळेच्या आयोजनापाठीमागील भूमिका विषद करीत वास्तुविशारद व विकासक हे वापरकर्ते आणि प्रणालीचे निर्माते महाआयटी यांचा परस्परांशी सुसंवाद घडवून आणून या प्रणालीचा वापर जास्तीत जास्त व्हावा यादृष्टीने समन्वयाचे काम कार्यशाळेच्या माध्यमातून महानगरपालिका करित असल्याचे सांगितले.



# स्वातंत्र्यसैनिक डॉ. रत्नाप्पा कुंभार यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्यसैनिक डॉ. रत्नाप्पा कुंभार यांची पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी (दि. २३) पनवेलमध्ये अभिवादन करण्यात आले.

या वेळी अध्यक्षस्थान प्रजापति समाज विकास मंडळ या सामाजिक संस्थेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष सी. पी. प्रजापति यांनी भूषविले. उपस्थित सर्वांनी आपल्या मनोगतामधून रत्नाप्पा कुंभार यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यासोबत त्यांच्या प्रेरणेने येणाऱ्या वर्षात मोठ्या स्वरुपात कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.



या वेळी राष्ट्रीय मुख्य महासचिव विनोद प्रजापति, पनवेल अध्यक्ष राजेंद्र प्रजापति, सचिव रवींद्र प्रजापति, कार्यकारिणी सदस्य गोवर्धन प्रजापति, जे. पी. प्रजापति, सिया राम प्रजापति, रोहित प्रजापति आदी उपस्थित होते.





### जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण. येत्या रविवारी, २५ डिसेंबर २०२२ रोजी वाचूया पोलादपूर (रायगड) येथील कवी, व्याख्याता व निवृत्त शिक्षक जयंत देशपांडे (एम.ए.बी.एड्.) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

### कामोठे वसाहतीत वाहनाची चोरी

**पनवेल :** कामोठे वसाहतीत वैभव जाधव यांनी त्यांची चार चाकी गाडी (एम एच ४६ बी इ ३९०४) ही घरासमोरील मंदिराच्या बाजूला उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



# रामबाग लोकार्पण सोहळा






































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com